# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १२.७.२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०५) इतिवृत्त

मंगळवार दिनांक १२ जुलै २००५ रोजे (दि. ६.७.२००५ रोजेची तहकूब सभा) स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.काशिनाथ कोकाटे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे दुपारी १२.३५ वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) श्री. खान मुजीब मिर आलम खान
(०३) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०४) श्री. गवळी रविकान्त काशीनाथ
(०५) श्री. जगीरदार अजीजमुख्तार अहमद
(०६) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०७) सौ.दलाल लता श्रीनिवास
(०८) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०९) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(१०) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(११) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(१२) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१३) श्री. विसपुते शशांक दामोधर
(१४) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

**संवाद :**

श्री.अजिजजहागिरदार : ही महानगरपालिका ज्यांचेमुळे अस्तिवात आलेली आहे असे थोर नेते असलेले पै.डॉ.रफिक झकेरीया यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे. त्यांना या सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्रीबारवाल गजनन : निश्‍चितपणे डॉ.रफीक झकेरीया हे थोर व्यक्ती होते त्यांनी या शहराच्या विकासासाठी चांगले काम केलेले आहे. नवीन शहर महानगरपालिका तसेच इतरही विकास कामे या शहरासाठी त्यांनी केलेली आहे.त्यांचे सहकार्यानेच हे सर्व काही झालेले आहे त्यांना या सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी यास माझे अनुमोदन आहे.

श्री.कवरसिंग बैनाडे : या शहराचे सर्वांचे परीचित असलेले थोर नेते व कार्यकर्ते पै.डॉ.रफिक झकेरीया यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले असून मी जेंव्हापासून या शहरात आलेलो आहे तेंव्हापासून त्यांचे नाव ऐकतो, नवीन शहर करण्यामधे त्यांचा सिहांचा वाटा आहे हे कोणीही विसरणार नाही.विकासात्मक कामे करतांना त्यांनी भेदभाव केलेला नाही या शहराला त्यांचे निधनामूळे मोठे दु:ख झालेले आहे. त्यांना भावपूर्व श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.विनायक पांडे : या शहरासाठी त्यांचे मोठे योगदान आहे. या शहरात त्यांनी मौलाना आझाद शिक्षण संस्था स्थापन केली .मोठमोठे कोर्सेस याशहरात त्यांनी आणले व याच कोर्सेससाठी विदयार्थ्यांना पुणे, मुंबई येथे जवे लागत असे. शिक्षण क्षेत्रात त्यांचा मोलाचा वाटा होता.अशा थोर नेत्याला या सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.मुजेब खॉन : पै.डॉ. रफिक झकेरीया यांचे या शहरासाठी मोठे योगदान आहे. असे योगदान कुणी दिलेले नाही असे माझे मत आहे.शिक्षण क्षेत्रात त्यांनीमोठे नाव कमविलेले होते. या महापालिकेतर्फे एक वास्तू उभारून तेथे शिक्षण क्षेत्र स्थापन करून डॉ. रफिक झकेरीया यांचे नाव देण्यास मान्यता देण्यात यावी.

श्री.अजेजजगीरदार :खऱ्या अर्थाने त्यांना श्रध्दाजंली अर्पण करायची असेल तर त्यांनी नेहरूभवन नावाची एक वास्तू बांधलेली आहे.परंतू आजत्या वास्तूमधे बसण्यासाठी खूर्ची नाही टेंबल नाही तेथे पंखे नाही त्या वास्तूसाठी या बजेटमधे २० लक्षची तरतूद करावी ही खरी श्रध्दाजंली ठरेल.

श्री. दिलीप गायकवाड:डॉ. रफिक झकेरीया यांनी या शहराचा कायापालक केलेला आहे. १९५६ मधे या शहराची लोकसंख्या ६० हजर होती आता १५ लक्षपर्यंत गेलेली आहे या शहराचे विमानतळ यास डॉ. रफिक झकेरीया याचे नाव देण्याचा ठराव सर्वसाधारण सभेत पारीत करून घ्यावा ही खरी श्रध्दाजंली ठरेल.

मा.सभापती : सर्वच सदस्यांनी डॉ. रफिक झकेरिया यांचेबध्दल आपआपले मत व्यक्त केलेले आहे. या शहराचा ज्यांनी मोठा विकास केलेला आहे त्यांना खऱ्या अर्थाने या शाहराच्या विकासाचा जनक म्हणावे लागेल.तसेच ते या राज्याचे माजी मंत्री होते त्यांचे परवाच्या दिवशी दु:खद निधन झालेले आहे.हे शहर त्यांचे कर्मभूमी असल्यामूळे त्यांचा अत्यंविधी सूध्दा येथेच करण्यात आलेला आहे.१९६२ मधे त्यांनी या शहराचे नेतृत्व करण्यास सुरूवात केली व ते तीन वेळेस मंत्रीमंडळात मंत्री म्हणून होते व ज्या ज्या खात्याचे मंत्री होते त्या बाबतीत त्यांनी या शहराचा १५ वर्षात संपूर्ण काया पालट केला.जेव्हाते आरोग्य खात्याचे मंत्री होते तेव्हा घाटी हॉस्पीटल चे एक मोठे नाव होते सर्व मराठवाडयातील जनता येथे येत असे ही त्यांचीच देणगी आहे तसेच या शहरात बेरोजगारांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून एमआयडीसी या शहरात आणण्यामध्ये मोठा वाटा त्यांचा आहे. पुर्वी मोठया प्रमाणात पाण्याची टंचाई या शहराला होती व शालेय परीक्षा सूध्दा मार्च अगोदर होत होत्या एवढी मोठी टंचाई होती.आजजेपाणी या शहरास येते ते त्याचेच कल्पनेचे माध्यमातून येत आहे, एवढेच नव्हे तर ते अभ्यासू होते विचारवंत होते. शिक्षण क्षेत्रात त्यांनी अत्यंत महत्वाचे काम केलेले असून त्यांनी चांगले काम केलेले असून त्यापासून आपण काही तरी घेण्यासारखे आहे.या शहराची लोकसंखया वाढत आहे व बाहेरून येणाऱ्यांची गैरसोय होते म्हणून नवीन सिडको हडको वसाहत त्यांनी निर्माण केली, जेव्हा त्यांचेकडे नगरविकास खाते होते तेव्हा. नगरपरिषद होती आज महानगरपालिका झालेली आहे म्हणून तुम्ही आम्ही सर्व या सभागृहात बसलेलो आहोत हे विसरता येणार नाही.त्यांनी जे विकास केलेला आहे त्या विकासाची धुरा पूढे नेण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे.व्यक्तीश:

आदर हा असलाच पाहिजे यांत शंका नाही.त्यांचे नावलौकिकासाठी ज्या सुचना सदस्यांनी मांडलेल्या आहेत त्या बाबतीत निश्चितपणे सर्वसाधारण सभेंच्या मान्यतेने करण्यात येईल आता त्यांना या सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करण्यात येत आहे सर्वांनी उभे रहावे.

(याच वेळी पै.डॉ. रफिक झकेरीया यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली)

मा.सभापती : आता अर्थसंकल्पावर चर्चा करावी.

**विषय क्र. १५ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये सन २००५-२००६ या वर्षीचा अर्थसंकल्प स्थायी समिती समोर सादर करणे.

**संवाद :**

श्री. बारवाल गजनन : प्रशासनाची या बाबत भूमिका काय हे प्रास्तावित करावे अशी विनंती आहे.

मा.सभापती : यापूर्वी मा.आयुक्त यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केलेले आहे.

श्री.दिलीप गायकवाड : स्लम भागासाठी या अर्थसंकल्पात ४ कोटी बजेट ठेवण्यात आलेले आहे त्यात दुरूस्ती करून २० कोटी करावे.

मा.सभापती : एकूण बजेटच्या ५ टक्के तरतुद ठेवण्यात आलेली आहे. सर्वच ठिकाणी आपणांस विकास करावयाचा आहे. सर्वच विषयावर सविस्तर चर्चा करावी.

श्री.रेणूकादास वैद्य : या बजेट मधे काही बाबी निश्चीतच चांगल्या आहेत. त्यात नवीन उदयोजकांना जकात करात सूट देणे , अपंगांना जगा देणे,नागरीकांचा विमा काढणे या नक्कीच कौतूकास्पद बाबी आहेत यात शंका नाही.परंतू यात नगरासेवकांनी सूचीत केलेल्या कोणात्याही कामाचा समावेश करण्यात आलेला नाही.स्पील ओवहरच्या कामाच्या संदर्भात सुरवातीस चर्चा करावी अशी माझी सूचना असून यात एकूण २३ कोटीची स्पीलओव्हरची कामे दाखविण्यात आलेली आहेत. यात ५०टक्के कामे कागदपत्राची पूर्तता, प्रत्यक्षात कामांना सूरूवात केलेली नाही. २५ टक्के कामे अशी आहेत की ती पूर्ण झालेली असून त्यांची बिले राहिलेली आहे.जी कामे टेंडंर प्रोसेसमधे आहेत वर्कऑर्डर देण्यात आलेली नाही, कामे सुरू झालेली नाही अशा पध्दतीची जी कामे त्यांचा अभ्यास करण्यासाठी संबधीत अधिकारीव नगरसेवक याची एक समिती स्थापन करावी व काही कामे वगळून स.सदस्यांनी जे जे कामे दिलेली आहे त्यास प्राधान्य देता येईल.

श्री.अजेजजगीरदार :सादर करण्यात आलेले अंदाजपत्रक हे शिलकी अंदाजपत्रक असल्याचे नमूद केले परंतू हे अंदाजपत्रक शिलकी नाही.कारण यात १४५ कोटी ही नेट उत्पन्न दाखविलेले आहे.३२ कोटी कर्ज उभारणी करणार आहोत.आणि २५ कोटी मालमत्ता कराचे वसूल होतील असा अंदाज ठेवलेला आहे.दरवर्षी ९ते १० कोटीपर्यंत कराची वसूली होते ती एकदम २५ कोटी दाखविण्यात आलेली आहे.दरवेळेस ९ कोटी वसूल करतो जस्तीत जस्त यात २ कोटीची वाढ होवून जस्तीत जस्त ११ कोटीपर्यत होवू शकते.यात १२ ते १३ कोटीचा फरक दाखविलेला आहे. हे कितपत बरोबर आहे ?

मा.सभापती : स.सदस्यांनी सूचना केलेली आहे त्या संदर्भात प्रशासन जी वसूली करणार आहे ती फिगर दाखविलेली आहे. ज्यांचेकडे बाकी आहे ती तर वसूल केलीच पाहिजे यात शंका नाही.त्यांना माफ करायची का? ६० ते ६२ कोटीची थकबाकी आहे अर्धा इंच कनेक्शनसाठी ४५०० रूपये खर्च येतो व आपण १८००/-रू. वसूल करीत आहोत.

श्री.कावडे साहेबराव : एका विषयावर चर्चा होत असतांना इतर विषयावर बोलू नये अशी सर्वांना विनंती आहे.सर्व भागात नागरीकांची कामे कशी होतील या दृष्टीने सर्वानी चर्चा करावी वसूली कशी करायची हा प्रशासनाचा भाग आहे बजेटमधे उत्पन्न कसे वाढविता येईल यावर बोलावे.

सौ.लता दलाल : या अर्थसंकल्पात २३ कोटीची कामे स्पील ओवहरची दाखविलेली असून प्रशासनाने सूध्दा नवीन नगरसेवक निवडून येतील त्यांची मागणी मोठया प्रमाणात विकास कामाची राहणार आहे व ही कामे मंजूर करतांना किंवा टेंडर काढतांना विचार केलेला दिसून येत नाही.अधिकारी सांगतात की ही कामे रद्द केल्यास विद्यमान सदस्य होतील परंतू जे सदस्य निवडून आलेले आहे त्यांनी विकास कामे करण्या बाबतची त्या त्या वार्डातील नगरसेवकानी यादी दिलेली आहे अशा कामांना प्राधान्य देवून स्पील ओवरची जवळपास ५० टक्के कामे कमी होऊ शकतील जे की टेंडर काढलेले आहे परंतू वर्कऑर्डर दिलेल्या नाही सदर कामे कमी करून पूढील बजेटमधे जशी तरतूद होईल त्याप्रमाणे करण्यात यावी.

श्री.मुजीब खॉन : स्पील ओवरची किती कामे झालेली असून बील देणे बाकी आहे व किती कामे करायची राहिलेली आहे किती कामाच्या बाबतीत वर्कऑर्डर दिलेल्या आहेत यांचा खुलासा करण्यात यावा त्यानूसार कोणती कामे स्थगीत करायची व कोणती घ्यायची हे ठरविता येईल.

श्री.बारवाल गजनन : रूपया कसा येतो यामधे दाखविण्यात आलेले आहे जकात कर ८० कोटी,पाणीपट्‌टी ४० कोटी ,कर्जउभारणी ३२.५० कोटी,मालमत्ता कर २५ कोटी अनुदान हे १५.२० कोटीचे आहे,सर्कीर्ण उत्पन्न हे १२.२२ कोटी,शासकीय व इतर दायित्व ९.६६ कोटी,नगररचना विभागाचे ६ कोटी वसूली होईल असे एकूण २२० .९८ कोटीचे उत्पन्न येईल असे दाखविण्यात आलेले आहे.परंतु मागिल वर्षाचे वसूलीचे टारगेट किती होते वसूली किती झाली सध्याची परीस्थिती काय आहे जकातीचे जे टारगेट होते तेवढी वसूल झालेली आहे का तसेच जेटारगेट या वर्षासाठी ठेवण्यात आलेले आहे ते योग्य आहे का ?पाणीपट्‌टीची वसूली ४० कोटी होईल असे दाखविले मागिल वर्षी किती वसूल झालेले आहे त्याचा खुलासा करावा.तसेच मालमत्ता कर व अनूदान किती मिळाले याचा खुलासा करण्यात यावा व स.सदस्य श्री वैद्य यांनी जे मुद्दा उपस्थित केला त्यांचाही खुलासा करावा.२३ कोटीची स्पील ओवरची कामे दाखविलेली असून सार्वजनिक आरोग्य व सफाईसाठी ६० कोटीची तरतूद असून २३ कोटी वज केल्यास फक्त ४० कोटीच विकास कामासाठी राहतील असे वाटते.सर्व खर्च एकीकडे व पाणीपूरवठ्यावर होणारा खर्च हा सारखाच आहे ४२ कोटी खर्च होणार आहे.कर्जची परतफेड ही ३३

कोटी दाखविलेली असून सर्वात मोठा बोज हा राहणार आहे.किरकोळ खर्चासाठी १६.४० कोटी ठेवलेले आहे पूढील विकास कसा करणार आहोत जलनिस्सारण साठी ५ कोटी शाासकीय देणे ४.६२ कोटी असून स्पील ओवहरच्या कामाच्या संदर्भात प्रशासनाची नेमकी भुमीका काय स्पष्ट करावे.जे उद्दीष्ट समोर ठेवलेली आहे खर्च समोर ठेवलेला आहे तो योग्य वाटत नाही सत्य परीस्थिती काय आहे ती समोर ठेवावी अशी विनंती आहे.

श्री.दिलीप गायकवाड : २३ कोटीची स्पीलओवहरची कामे नमूद केलेली आहे ती कामे झालेली आहे किंवा नाही किती कामे बाकी आहे यासाठी एक समिती गठीत करून चौकशी करून अहवाल देतील त्यानंतर बिले देता येईल.

श्री.कवरसिंग बैनाडे : सिडको हडको हा भाग या शहराचा एक भाग आहे येथील नागरीकांवर बजेटमधे तरतूद करतांना अन्याय केलेला दिसून येतो .सन १९९५ मधे मी या सभागृहाचा सदस्य होतो तेंव्हा सिडको मध्ये एक नाटयगृह उभारण्यासाठी तरतूद ठेवण्यात आलेली होती आतापर्यत कार्यवाही झालेली नाही.या नाटयगृहासाठी टोकन रक्कम म्हणून ५ लक्ष ठेवण्यात यावे तसेच गरवारे स्टेडीयम मधे जलतरण यासाठी १० लक्षची तरतूद करण्यात यावी.

श्री रविकान्त गवळी : २३ कोटीची स्पील ओवहरची जे कामे दाखविलेली आहे यामधे किती कामे झालेली आहे व वर्कऑर्डर देवूनही काही कामे झाली कि नाही मूदत संपलेली यांचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : २३ कोटीच्या स्पील ओवहरच्या कामाच्या बाबतीत स.सदस्यांनी जे मुददा उपस्थित केला त्या संदर्भात वेगवेगळया विभागाची ही कामे असतील या संदर्भात शहर अभिंयता यांनी खुलासा करावा . परंतु शहर अभियंता हे उपस्थित नाही असे वाटते.अति.शहर अभियंता यांनी त्यांचे विभागाचे कामाच्या बाबतीत खुलासा करावा.

श्री.रेणूकादास वैद्य : महत्वाची बैठक असतांना अधिकारी गैरहजर आहेत हे बरोबर नाही.कोणत्या अधिकाऱ्यांच्या रज आलेल्या आहेत .कोणी रज दिलेली नाही सभागृहाला माहिती देण्यात यावी

मा.सभापती : ज्या पदाच्या संदर्भात लेखी परीक्षा घेण्यात आलेल्या होत्या त्या उमेदवाराच्या आज तोंडी मुलाखती आहे अधिक्षक अभियंता तसेच उपआयुक्त या परीक्षेसाठी गेलेले असून उर्वरीत सर्व संबधीत अधिकारी बैठकीला उपस्थित आहे.

श्री.रविकांन्त गवळी : आजची सभा महत्वाची असून एखादया महत्वाच्या विषयावर चर्चा होते तेव्हा अधिकारी नुसते ऐकतात तसेच मागिल बैठकीत बजेट बाबत चित्रफितवर माहिती दाखविण्यात आली त्यावेळी काही अधिकारी मागच्या बाजूने बसलेले होते.

मा.सभापती : स.सदस्यांच्या भावना लक्षात घेवून अधिकाऱ्यांनी कामात रूची दाखवावी.

अति.शहर अभियंता : २००५-०६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात स्पील ओवहरची माझ्याकडे असलेल्या विभागाची कामे ही ४.३० कोटीची कामे या वर्षात आलेली आहे.यापैकी २० लक्षचीच कामे अशी आहेत की ती या वर्षी नाही केली तरी चालतील ही कामे वगळता येतील या कामाचे वर्कऑर्डर दिलेल्या नाहीत.

मा.सभापती :स्पील ओवरची जी यादी आहे ती मोठी नाही त्या कामाची सध्याची परीस्थिती काय आहे याची माहिती देण्यात यावी.

श्री.रेणूकादास वैद्य : उर्वरीत ४.१० कोटीची कामे झालेली आहेत का ?या कामाची वर्कऑडर देतांना अर्थसंकल्पात तरतूद होती का , माझ्या माहिती प्रमाणे वर्कऑर्डर देवूनही काही कामे अद्याप सुरू झालेली नाहीत, अशी कामे किती आहेत.

अति.शहर अभियंता : फक्त २० लक्षच्या कामाची वर्कऑर्डर दिलेली नाही ते नाही केले तरी चालेल. ज्या कामाच्या वर्कऑर्डर दिलेल्या आहेत आचारसंहितेमुळे काही कामे झालेली नाहीत.

सौ.लता दलाल : ४.३० कोटीची तरतूद होती त्यापैकी २० लक्षची कामे कमीकरता येतील असे अधिकारी सांगतात तर उर्वरीत ४.१० कोटीची कामे झालेली आहेत का त्या कामाच्या वर्कऑर्डर दिलेल्या आहेत व किती कामे सूरू झालेली नाही सुरू झालेली असतील तर आम्हाला अभिमान वाटतो परंतु मध्यतंरी आचारसंहिता होती त्यामूळे माझ्या माहिती प्रमाणे बरीच कामे झालेली नाही ती कोणती कामे आहेत व कोणत्या भागातील आहे सध्य स्थिती काय आहे .

अति.शहर अभियंता : सर्वात मोठे जे काम होते ते कोकणवाडी ते रेल्वेस्टेशन या रस्त्याचे ६२ लक्षचे काम स्पील ओवहरमधे आलेले आहे. सदर काम चालू असून मार्च अखेर पर्यत फक्त १५ लक्षच खर्च केलेले आहे. पान क्र २२ वर नवीन डांबरीकरण या शिर्षकाखाली क्र १ चे काम आहे नूकतेच स्थायीसमिती मधे मंजूर झालेले असून वर्कऑर्डर देण्यात आलेली नाही.मुकूंदवाडी चौक येथील दोन क्रमाकाचे काम सूरू आहे. सातारा भागातील काम सूरू आहे. गजनन महाराजमंदीरा जवळील काम पूर्ण झालेले आहे.

श्री.रेणूकादास वैद्य :कोकणवाडी ते रेल्वेस्टेशन पर्यतच्या रस्त्यांवर मागिल तीन वर्षात किती खर्च झालेला आहे.

अति.शहर अभियंता :मागिल १० वर्षात या रस्त्यावर खर्च झालेला नाही .प्रथमत काम हाती घेतलेले आहे.

सौ.लता दलाल : या वर्षात या कामाची रक्कम स्पील ओहर म्हणून किती आलेली आहे जे १५ लक्ष खर्च केले ते मागिल बजेटमधे येतील.

अति.शहर अभियंता : एकूण या रस्त्यावरील अंदाजपत्रक हे ७३ लक्षचे होते त्यापैकी १५ लक्ष खर्च केलेले आहे उर्वरीत रक्कम ही स्पील ओवरमधे आलेली आहे.

मा.सभापती : या रस्त्यामधे कोणत्या बाबीचा समावेश केलेला आहे.रस्त्याची रूंदी किती डांबरीकरण केले किती इंची टाकलेले आहे. माहिती देण्यात यावी.

अति.शहर अभियंता : पूर्वी हा रस्ता २० ते २१ मीटर होता आता ३० मीटीर रूंद करीत आहोत.

श्री.बारवाल गजनन : अधिकारी सांगातात १० वर्षापासून यारस्त्याचे कामच केलेले नाही परंतू पॅचवर्क व इतर कामे झालेली आहे. अनेक वेळा डांबरीकरण झालेले आहे.

अति.शहर अभियंता : पॅचवर्क काम हे नेहमीच करावे लागते ते प्रत्येक रस्त्यावर केलेले आहे.नवीन डांबरीकरण गेल्या १० वर्षात झालेले नाही.

श्री.रेणूकादास वैद्य : बी ॲण्ड सी मधे रस्त्याची कामे करतांना रजिष्टरला नोंद केलेली असते या महानगरपालिकेत काय पध्दत आहे.बायलाज मधे अशी पध्दत आहे की

कोणतेही काम केल्यानंतर त्यांची माहिती महानगरपालिकेकडे असावी. माहिती नसेल तर खर्च होतो की नाही येथून सुरूवात करावी लागेल.

अति.शहर अभियंता :हिस्ट्री रजिष्टर आपल्याकडे ठेवत नाही.परंतु कोणता रस्ता केव्हा करण्यात आलेला आहे किती खर्च झालेला होता पूर्ण केंव्हा झाला याची नोंद आहे.

मा.सभापती : साधा प्रश्न आहे या रस्त्यासाठी ७३ लक्षचे अंदाजपत्रक होते रस्ता किती रूंद केला अगोदरची रूंदी किती मीटर होती नंतर वाढ किती केलेली आहे किती इंच डांबर टाकलेले आहे तसेच डांबरीकरण करण्या अगोदर अगोदरचा बेस हा किती इंच होता मातीचा होता की डांबराचा कि मूरूम टाकलेले होते.७३ लक्षचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले ते योग्य आहे का हा प्रश्न सर्वांचा आहे.

अति.शहर अभियंता : मोठया प्रमाणात हा रस्ता नादुरूस्त आहे त्यामूळे एवढा मोठा खर्च त्यास येत आहे

श्री.रेणूकादास वैद्य : आतापर्यंत रस्त्याच्याकामाच्या संदर्भात मेन्टनस् रजिस्टर ठेवलेले नाही.परंतू भविष्यात जी कामे मंजूर होतील त्या कामाचे रजेस्टर नोंद ठेवावी तसे आदेश आपण दयावे.

श्री.बारवाल गजनन : हा रस्ता महत्वाचा आहे प्लॅनींगनूसार काम चालू आहे परंतू काही ठिकाणच्या जगा भूसंपादीत करवयाच्या असल्यामूळे हे काम मागे पडत आहे रेल्वेस्टेशन भागात काही दूकानाचा वाद कोर्टात चालू आहे तो वाद संपलेला आहे किंवा काय आता जगा ताब्यात घेऊन तो रस्ता मोठया करण्याची व तात्काळ काम होण्याची गरजआहे आणखी बजेट लागत असेल तर तरतूद करावी.

श्री.रेणूकादास वैद्य : हा रस्ता मोठा व महत्वाचा आहे परंतू यात अधुनिकीकरण करण्यामधे कोणत्या कामाचा समावेश आहे एवढे मोठे बजेट एका रस्त्याच्या कामासाठी खर्च केल्यास इतर सर्व भागातील रस्त्याची कामे होतील असे वाटत नाही

मा.आयुक्त : एकच बाब आहे की रोड रजिस्टर नाही. संबधीत अधिकारी यांना सूचना की आता यापूढे रजिस्टर ठेवावे कॅपीटल खर्च असेल परंतू प्रत्येक वर्षामध्ये त्या रस्त्यावर किती खर्च होतो, हे असावे. आधुनिकीकरण म्हणजे त्यासाठी रोड फर्नीचर सुध्दा आहे का ?

अति.शहर अभियंता : यात साईड गटार व रोड फर्निचर आहे.

सौलता दलाल : हा रस्ता झाला पाहिजेत्या रस्त्यावरून पर्यटक येतात हे सर्व सत्य आहे परंतू गेल्या १० वर्षात यारस्त्याचे कामच झाले नाही त्या रस्त्यावर पॅचवर्क किंवा सील कोटींग केले असेल आताची परीस्थिती ही त्या रस्त्यावर ७३ लक्ष खर्च करण्या इतपत मूळीच नाही सध्या सिलकोटींग वगैरे करावे व स्पील ओवरचे काम स्थगित करावे आणि ती रक्कम ज्या वार्डात गेल्या ५ वर्षात कामेच झाली नाही अशा वार्डाना न्याय दयावा ५ कोटीची कामे एकदम एकाच वर्षात एकाच वार्डात करण्या ऐवजी १० वार्डात १-१ कोटीची कामे करावी.

श्री.बारवाल गजनन : शहरातील मोठे रस्ते कॉक्रेटींग करण्याचा ठराव सर्वसाधारण सभेत मंजूर केलेला आहे. या रस्त्याचे काम चालू होते म्हणून हा रस्ता त्यात घेतलेला नाही या रस्त्याचे काम प्राधान्याने करावे आपण स्वत: पाहणी करावी योग्य तो निर्णय घ्यावा.

श्री. रेणूकादास वैद्य : रस्ते विकास महामंडळ जेरस्ते करणार आहे व महानगरपालिके मार्फत जेरस्ते होणार आहे एका च रस्त्यासाठी दोन ठिकाणी तरतूद तर नाही ना तपासून घ्यावे.

मा.आयुक्त : गेल्या वर्षात एकूण आवक ही १२३ कोटीचीच झालेली आहे १० टक्के प्रमाणे २३ कोटीची स्पील ओवहरची कामे ही जस्तच होतात एकदम २३ कोटीची कामे आपण करणार नाही पूढील वर्षी १७-१८ कोटीचे स्पील ओवर राहील जे बोज पडणार आहे तो ४-५ कोटीचाच पडेल ३-४ वर्षात स्पील ओवरची कामे ही ५ ते ६ कोटी पर्यत आणण्याचा प्रयत्न करू त्या पेक्षा जस्त होणार नाही जरी ६० लक्षचे हे काम असेल परंतू थोडे रस्ते असे असतात की पूर्ण शहराला त्याचा फायदा होतो अशा रस्त्यावर जस्त पैसा खर्च करूनच करावा लागेल रस्ते विकास महामंडळ यांचे १६५ कोटीचे प्रपोजल असून त्यापैकी १०० कोटीचे रस्ते होतील त्या रस्त्यातील सर्व्हीस लाईनचे व भूसंपादनाचे काम महापालिकेस करावे लागणार आहे. एकच रस्ता दोन वेळस होणार नाही सर्वीस लाईन शिफ्ट कराव्या लागतील बाकी खर्च रस्ते विकास महामंडळ करणार असून उर्वरीत रक्कम ते टोलटॅक्स लाऊन वसूल करणार आहे.

श्री.बारवाल गजनन : २३ कोटी खर्च करणार नसेल यातील कोणती कामे कमी करणार आहे खुलासा करावा.

मा.आयुक्त : स्पील ओवरमधे एखादे मोठे काम ४० ते५० लक्षचे असेल तर ते एका वर्षात खर्च होत नाही उर्वरीत रक्कम ही स्पील ओवरमधे जणार असते.

श्री. रेणूकादास वैद्य : प्रत्येक कामावर एक वर्षात जेवढी रक्कम खर्च होवू शकते तेवढीचरक्कम त्या कामाची नमूद करण्यात यावी जस्तीची फिगर कशासाठी देतात.

मा.आयुक्त :बजेट १७३ कोटीचे होते जमा १२३ कोटी च असल्याने जमा रक्कम कमी असल्याने खर्च तर होत गेलेला आहेत म्हणून स्पील ओवरमधे आलेले आहे

श्री.रेणूकादास वैद्य :एका वर्षात फक्त १५ लक्षच या रस्त्यावर खर्च झालेले आहे या वर्षात आता ६५ लक्ष खर्च करणार आहात का, जे खर्च होवू शकतो तेवढीच रक्कम टाकणे आवशक आहे. आताच स.सदस्य श्री बारवाल यांनी भुसंपादनाचा प्रश्न उपस्थित केला, भूसंपादन झाले नाही तर रस्ता पूर्ण होणार का?

मा.सभापती : सव्वा कि.मीटरचा रस्ता आहे जेथे रस्ता रूंद करता येईल तोच भाग यात घेतला आहे असे मला वाटते.भूसंपादनाचा भाग यात घेतलेला दिसत नाही अभिनय टाकीकडे जे रस्ता जतो त्या रस्त्याची एक बाजू रूंद करण्याच कुठलेही अंदाजपत्रक यात आलेले नाही.

मा.आयुक्त : ६५ लक्ष पूर्ण खर्च होणार आहेत भूसंपादनाची गरजआहे का ?

अति.शहर अभियंता : पूर्ण खर्च या वर्षात होईल या रस्त्यासाठी भूंसपादनाची गरजभासत नाही.

श्री.विनायक पांडे : सव्वा कि.मीटरचा रस्ता करण्यासाठी ७३ लक्षची आवशकता आहे का असे कोणते काम त्या रस्त्यावर होणार आहे.

मा.आयुक्त : ॲटम चेक करू शकता.

मा.सभापती : प्रशासनावर कोणी ताशेरे ओढत नाही जुन्या रस्त्यासाठी ७३ लक्ष तर नवीन रस्त्यासाठी किती खर्च लागेल असा विचार पडतो. सव्वा कि.मी. रस्त्यासाठी

अधुनिकीकरणासाठी ७३ लक्ष लागत असेल तर बरोबर नाही ७३लक्ष मधे नवीन रस्ता होवू शकतो म्हणून स.सदस्याच्या भावनाशी मी सहमत आहे.

श्री.अजीजजगीरदार : मागिल वर्षाचे १७३ कोटीचे बजेट होते १२० कोटी वसूल, ५३ कोटी कमी. १० कोटीचा ड्राफ्ट तोडला पान क्र ११ वर अ.क्र १५ मधे नक्षत्रवाडी गाव येथे दगडी गटार बांधणे बाबत पैठण रस्ता हा बीॲण्डसीचा आहे तर गटार बांधकामासाठी महानगरपालिका ५ लक्ष का खर्च करीत आहे.बजेटमधे रोडलगत असे दिलेले आहे.

शहर अभियंता : रोडलगतच आहे महापालिकेच्या अंतर्गत येते. गांव आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : ७३ लक्षचे या रस्त्याचे काम करीत आहोत त्याचप्रमाणे पान क्र ३० वर अ.क्र १,२,९,१२ असे मिळून ४१ लक्षचे बजेट दूभाजक व सूशोभिकरणासाठी ठेवण्यात आलेली आहे. उदयानसाठी ९० लक्षची तरतूद केलेली आहे उदयान विभागा मार्फत दूभाजक व सुशोभिकरण करून घेवू शकतो. अशी मोठमोठी कामे हाती घेवून इतर कामासाठी पैसा शिल्लक राहील असे वाटत नाही. अशी कामे स्थगित ठेवावी नवीन कामे जी आहेत त्यांना प्राधान्य देण्यात यावे.

श्री.विनायक पांडे : मकईगेट ते बेबीचा मकबरा या रस्त्याचे सौदर्यीकरणासाठी १० लक्षची तरतूद ठेवलेली आहे पुरातत्व विभागाचे अधिक्षक या रस्त्यावर काम करू देत नाही तो रस्ता पूरानत्व खात्याच्या अंतर्गत येतो असे त्यांचे म्हणणे असून जपान सरकार त्यासाठी फंडस् उपलब्ध करून देतात असे असतांना १० लक्षची तरतूद ठेवण्याची गरजआहे का?

अति.शहर अभियंता :जे मधला रस्ता आहे त्या वरून पर्यटक जतात त्या रस्त्यावर दूभाजक आहे त्यास चांगले स्वरूप दयावे त्यामूळे प्रशासनाने प्रस्तावित केलेले आहे. काम करायचे नसेल तर सभागृहाने निर्णय घ्यावा.

श्री.दिलीप गायकवाड : ४.३० कोटीचे बजेट या विभागासाठी ठेवण्यात आले होते त्यात कोणकोणती व कोणत्या भागातील विकास कामे करण्यात आलेली आहे खुलासा करावा सदस्यांना माहिती होईल.की ते काम झालेले आहे किंवा नाही.

श्री.मुजेब खॉन : मागिल आडवठ्यात वृत्तपत्रात आले की पुरातत्व खात्याची परवानगी घेवून काही वास्तूचे सौदयीकरण करणार आहोत त्या संदर्भात बैठक झालेली आहे का याचा खूलासा करावा अशी बातमी महानगरपालिके मार्फत येणे आवशयक आहे मी मा.विभागीय आयुक्तांना भेटलो. रोशनगेटचे काम महानगरपालिकेने करावे. मा.विभागीय आयुक्त व पुरातत्व विभाग म्हणतात मनपाने करावे व करायला गेल्यावर काम करू देत नाही.

मा.आयुक्त : संबधीत विभागाशी चर्चा करता येईल.या संदर्भात ३ तारखेला बैठक झालेली आहे पूरातत्व वास्तूच्या संदर्भात काम करावयाचे झाल्यास हेरीटेज कमेटीच्या मार्फत प्लॅन घ्यावा लागेल.

श्री.विसपूते शंशाक : सव्वा कि.मी.रस्त्यासाठी ७३ लक्ष खर्च होणार आहे .

श्री.मूजेब खॉन :या शहरात जे मोठमोठे गेट आहेत त्यांची दूरूस्ती होणे आवशक आहे सौदयीकरण करणे आवशक आहे तात्काळ एनओसी घ्यावी व काम सुरू करावे.

| | |
|---|---|
| मा.सभापती | : या संदर्भात यापूवीही चर्चा झालेली होती संबधीत विभागाची एनओसी घेवून मा.आयुक्त यांनीयात जतीने लक्ष घालून पाठपूरावा करावा व ताबडतोबीने कशी कामे हाती घेता येतील यासाठी प्रयत्न करावे. |
| अति.शहर अभियंता | : एसएससी बोर्ड ते रेल्वेस्टेशन या रस्त्याचे कामाचा समावेश आहे.तसेच वेदांत हॉटेल ते रेल्वेस्टेशन याही रस्त्याचा समावेश आहे. |
| श्री.रेणूकादास वैद्य | : ज्यावेळेस रस्ते होतात त्या रस्त्याचा उतार कसा व किती असावा याकडे अधिकारी लक्ष देत नाही अनेक भागातील रस्त्यावर पाणी साचलेले दिसून येईल. |
| अति.शहर अभियंता | : १५ लक्षचे जे काम केलेलेआहे त्या रस्त्यावर पाणी साचलेले दिसून येणार नाही आपण पाहणी करू शकता यावेळेस पूर्णपणे दक्षता घेतलेली आहे एसबी कॉलेज ज्वळ बस स्टॉप ज्वळ मोठया प्रमाणात पाणी साचलेले असायचे परंतू आता तेथे पाणी साचलेले दिसून येणार नाही. |
| श्री.बारवाल गजनन | :पदमपूरा ते हनुमान मंदिर पर्यंतचा रस्ता अरूंद आहे डबल वाहन जऊ शकत नाही. |
| अति.शहर अभियंता | : या बाबतीत माहिती नाही पाहणी करून सांगता येईल. |
| मा.सभापती | : तांत्रिक बाबी तपासून रस्त्याची कामे करावी अशा सूचना अधिकाऱ्यांना देण्यात येतात. |
| सौ.लता दलाल | : कोकणवाडी चौक ते रेल्वेस्टेशन या रस्त्यासाठी ७३ लक्षची तरतूद दाखवली असे किती रस्ते प्रस्तावित केलेले आहे याची माहिती देण्यात यावी. |
| अति.शहर अभियंता | : मोठे रस्ते प्रस्तावित केलेले नाही. |
| सौ.लता दलाल | : मागिल वर्षी बज्ेट कमी असतांना पैसा उपलब्ध नसतांना ७३ लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे अशी मोठमोठी कामे बज्ेट उपलब्ध होत नसतांना का नमूद केली जतात. |
| मा.सभापती | : स.सदस्यांची मूळ भावना अशी आहे की,एका वर्षात १५ लक्ष खर्च केलेले असून या वर्षात ६५ लक्ष खर्च होणार आहे का सव्वा कि.मी रस्त्यासाठी ७३ लक्ष लागतात तर नवीन काम असते तर किती रक्कम खर्च झाली असती असा प्रश्न पडतो. |
| श्री.दिलीप गायकवाड | : रोषणगेट ते आझाद चौक रस्त्याचे अर्धवट काम का थांबलेले आहे याचाही खूलासा करण्यात यावा. |
| सौ.लता दलाल | : गेल्या वर्षात १५ लक्ष खर्चकेले या वर्षात १५ लक्ष खर्च होतील उर्वरीत रक्कम इतर कामासाठी वळती करून घेण्यात यावी. |
| मा.सभापती | : कमी खर्चात या रस्त्याचे काम कसे होईल याबाबत मा.आयुक्त व अधिक्षक अभियंता यांनी तांत्रिक बाबी तपासून प्रशासकीय पातळीवर हे काम करावे. |
| श्री.रेणूकादास वैद्य | : दूभाजकावर ४१ लक्षची तरतूद ठेवलेली आहे ती रद्य करावी उदयान विभागाच्या तरतूदीमधून ते काम करावे. |
| श्री.मुजीब खॉन | : रोषणगेट ते आझादचौक हा डीपी रोड आहे या रस्त्यावर काही जगा भूंसंपादीत करावयाच्या होत्या म्हणून काम अर्धवट ठेवलेले आहे या बज्ेटमधे कोठेही आलेले नाही का घेण्यात आलेले नाही याचा खूलासा करावा. |

मा.आयूक्त : रस्ते विकास महामंडळाने मोठे रस्ते विकास करण्यास हाती घेणार आहे दोन वर्षात जवळपास १०० कोटीचे रस्ते होतील काही रस्ते हे सिमेंट कॉंक्रीटचे करायचे, सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला आहे चांगल्या प्रतीचे काम करायचे आहे. कॉंक्रीट किंवा चांगले डांबरी रस्ते करायचे. यानंतर पी.एम.सी.लावून अंदाजपत्रक करून कसे करता येईल, अभ्यास केल्यानंतर समोर येईल.

श्री.अजीजजगीरदार : कोकणवाडी चौक ते रेल्वेस्टेशन या रस्त्यासाठी ७३ लक्ष खर्च होणार आहे का?

मा.सभापती : यासंदर्भात निर्णय दिलेला आहे तात्रिक बाबी तपासून काही सेवींग होत असेल तर त्याचा समावेश इतर कामामधे करता येईल.

श्री. अजीजजगीदार : सर्वसाधारण सभेने एकदा ठराव घेतल्यानंतर पून्हा ३ महिने ठराव घेता येत नाही विधी सल्लागार यांचेकडे पाठवावे डिफर पेमेन्टवर करावे.

श्री.रविकांन्त गवळी : सन२००५-०६ यावर्षाचे फक्त ८ महिनेच बाकी आहे खर्च करावयाचे नाही वसूली करणार नाही. १७३ कोटीचा अर्थसंकल्प होता १२३ कोटीखर्च केले ४० कोटी या वर्षात विकास कामे होणार आहे स्पील ओवरची २३ कोटीची कामे आहेत नवीन कामांचा कीती बजेट शिल्लक राहणार आहे नवीन जी कामे आहे ती घेण्यात यावी या वर्षाचे २३० कोटीच्या बजेट आहे १५० ते १६० कोटी वसूल होतील यातील विकास कामावर किती खर्च करणार आहे स्पील ओवरची कामे ही जून्या वार्डात होती आता वार्डाचा काही भाग इतर वार्डात गेलेला आहे जी जी कामे महत्वाची आहेत तीच कामे करण्यात यावी उर्वरीत कामे रद्य करावी अशी माझी विनंतीआहे. नवीन कामांना प्राधान्य देण्यात यावे.

श्री.मूजीब खॉन : स्पील ओवहरची कोणकोणती कामे झालेली आहे कोणते काम चालूआहे व कोणती व कोणत्या भागातील कामे कमी करता येतील याचा खूलासा घेण्यात यावा.व स्पील ओवहरची कामे कमी करून नवीन कामांना प्राधान्य देण्यात यावे.

मा.सभापती : आता शहर अभियंता यांनी खुलासा करावा की कोणकोणती कामे कमी होवू शकतील.

शहर अभियंता : शहर अभियंता याविभागाकडे ३.४५ कोटीचे बजेट देण्यात आलेले होते यात स्पिल ओव्हरच्या कामाचा समावेश आसून स्लम भागातील काही कामे आहेत त्यात उद्यान, इमारत बांधकाम समावेश आहे माझ्या माहितीनूसार सात ते आठ कामे सोडली तर उर्वरीत कामाच्या वर्क ऑडर दिलेल्या आहेत.३.४५ कोटीमधून जेंव्हा मी आढावा घेतला तेंव्हा यापैकी २५ लक्षची कामे कमी होवू शकतील.जेमाझ्या दृष्टीनेआजआवशक नाही असे माझे मत आहे.

श्री.मुजीब खॉन : इमारत बांधकामासाठी किती बजेट होते व किती काम केलेले आहे किती कामाच्या वर्कऑर्डर दिलेल्या आहेत खुलासा करावा.

शहर अभियंता : यात आरेफ कॉलनी येथील जिमनॅशियम हॉल बांधणे हे काम चालू आहे चिकलठाणा येथील २० खाटी दवाखांना बाधण्याचे काम आता सूरू करणार आहे.या कामास मंजूरी मिळालेली आहे.

श्री.अजेजजगीरदार : चिकलठाणा येथील दवाखान्यासाठी या वर्षात १०लक्षच खर्च करायचे असे ठेकेदाराकडून लिहून घेतलेले आहे नंतरचे काम याच पध्दतीने पूढे करून घेणार आहोत असे असतांना यामधे ३१ लक्ष नमूद का केलेले आहे.

मा.सभापती :स्पील ओवहरमधे १० लक्ष उर्वरीत रक्कम चालू वर्षात खर्च करायचे अशी माझी माहिती आहे.

शहर अभियंता : १० लक्ष या वर्षात खर्च करण्याचे ठरवले आहे परंतू या वर्षात निश्चितच २० ते २१ लक्ष खर्च होतील असे वाटते.

श्री.अजेजजगीरदार : १० लक्षचे काम करावे या वर्षात तशी मंजूरी देण्यात आलेली आहे त्यानूसारच काम करावे.

मा.सभापती : संबधीत विषयाला या सभागृहात मागिल बैठकीत मंजूरी दिलेली आहे बजेटच्या बैठकीत कोणत्या कामास प्राधान्य दयावयाचे हे आपण ठरवावे.

श्री.अजेजजगीरदार : १० लक्षलाच मंजूरी दिलेली आहे तेवढ्याच रक्कमेचे दवाखान्याचे काम करावे.

शहर अभियंता : गितानगर शाळेवर पहिला मजला बांधणे हे काम संपत आलेले आहे.जयभिमनगर येथील समाजमंदिराचे नुतनीकरण करणेचे काम चालू आहे नक्षत्रवाडी येथील महानगरपालिकेच्या शाळेची इमारत बांधणेचे काम चालू असून यावर्षात तो पूर्ण खर्च होणार आहे.बन्सीलालनगर येथे आरोग्य केंद्रांचे काम जवळपास संपत आलेले आहे.महानगरपालिकेच्या खूल्या जगेत टेनिस कोर्ट बांधणेचे काम सुरू करावयाचे आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : टेनिस कोर्टचे काम स्थगित करण्यात यावे हे काम आवशक नाही

शहर अभियंता : २५ ते ३० लक्षचे काम कमी होवू शकतात.यानंतर मसनतपूर येथे व्यायाम शाळा बांधणे त्यानंतर मिरा सलामी हॉल बांधणेचे काम संपत आलेले आहे चेतनानगर येथे खूले व्यासपिठ बांधणे जवळपास ८० लक्षचे स्पील ओवहरची कामे इमारतीमधे आहेत.

मा.सभापती : आजपर्यत महानगरपालिकेच्या वतीने शहरात मोठमोठया इमारती तसेच लहान मोठी दूकाने अशी एकूण ३००० ते ३५०० वास्तू आहेत त्यातील जवळपास ५० टक्के या वास्तू वापरात नाहीत.अनेक वार्डात व्यायाम शााळा केलेल्या आहे ते चालू नाही किंवा कोणत्या संस्थेला सुध्दा दिलेल्या नाहीत.

श्री.रेणूकादास वैद्य : अशा वास्तू दुकाने ज्या वसाहतीमधे आहेत तेथील भागातील स्वयंसेवी संस्थांना देण्यात यावेत त्यासाठी ज्या काही अटी शर्ती आहेत त्या शिथिल करण्याची गरज आहे असे मला वाटते.ऑडीट झालेली ३ वर्षाची संस्था असावी असा महापालिकेचा नियमात आहे अशा संस्था काही असतील परंतू प्रत्येक भागात असणार नाही.म्हणून नवीन संस्था जरी असेल त्यांना भाडेतत्तवावर इमारती दुकाने देण्याची कार्यवाही करावी या वास्तू वापरात पण येतील व महानगरपालिकेचे यामूळे मोठे उत्पन्न वाढू शकते.

श्री.विनायम पांडे : अशा वास्तू भाडेतत्वावर सेवाभावी संस्थांना देतांना त्यापध्दतीनेच कमी भाडे आकारण्यात यावे.

मा.सभापती :यासंदर्भात प्रशासनास सूचना करण्यात येत आहे की शहरात ज्या ज्या भागात अशी दूकाने व वाचनालय जिमनॅशियम हॉल ज्या ज्या वास्तू असतील त्या

रिकाम्या असतील अशा सर्व वास्तू भाडेतत्वावर कशा देता येतील व त्यासाठी नियमात काही तरतूद करून ही कार्यवाही करावी .१०० टक्के अशा वास्तू दुकाने ही वापरात आली पाहिजे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे या सर्व वास्तू व दूकाने किरायाने जत नाही तोपर्यत नवीन काही बांधकाम करू नये तो पैसा पाणीपूरवठा व ड्रेनेज व रस्त्यासाठी खर्च करणे आवशक होईल जूने रस्ते नाही तर नवीन रस्त्यासाठी खर्च करण्याची गरजआहे.

श्री.गजनन बारवाल : ज्या भागातून महापालिकेस बेटरमेंन्ट चार्जेस मिळालेला आहे त्या भागातील सुविधा देण्यास प्राधान्य देण्यात यावे, त्या नागरीकांचा विचार करावा.

सौ.लता दलाल : क्रमांक ७ मध्ये जयभिमनगर घाटी येथे विद्यापीठासाठी प्रतिकृति तयार करणे म्हणजेकाय विषय समजलेला नाही. शहर अभियंता यांनी खूलासा करावा.

शहर अभियंता : विद्यापीठाचे जसे गेट केलेले आहे त्याप्रमाणे लहानसे गेट तेथे करावे असे नमूद आहे.

मा.सभापती : पुन्हा असे विषय चर्चेला येणार नाही यांची काळजी प्रशासनाने घ्यावी बजेट ठेवत असतांना वेगळा कोणी विचार करीत असेल तर अत्यंत चूकीचे आहे.अशा चूका पून्हा प्रशासनाच्या वतीने होवू नये.

श्री.मुजीब खॉन : रविंद्रनगर भागात दवाखान्यासाठी एक हॉल तयार करण्यात आलेला होता स्लम भाग असून तेथे पूर्ण अतिक्रमण केलेले आहे.या संदर्भात मी दोन तीन वेळेस पत्र दिलेले आहे कार्यवाही झालेली नाही महापालिकेच्या ताब्यात घेवून भाडेतत्तवावर किंवा महानगरपालिकेने दवाखान्यासाठी वापरावे.

मा.सभापती : दोन महिण्यात अशा इमारती महापालिकेने ताब्यात घेवून त्याची देखभाल दुरूस्ती पण करण्याची गरजआहे अशा ज्या इमारती ज्या वापरासाठी बांधण्यात आलेल्या आहेत त्याचा वापर जे पर्यंत करीत नाही तो पर्यत नवीन इमारती बांधण्याची आवशकता नाही असे सर्वसाधारण मत या सभागृहाचे आहे सभागृहात जी चर्चा झालेली आहे त्यानूसार जी कामे कमी करणार आहे पैसे शिल्लक राहतील त्या कामाची यादी उदया सकाळी देण्यात यावी.

सौ.लता दलाल : स्पिल ओवहरची कामे सध्या प्रगती पथावर चालू आहे व ज्याकामांना वर्कऑर्डर दिलेल्या आहे अशा कामाची चौकशी करण्यासाठी एक समिति गठीत करावी त्यात स.सदस्यांचा तसेच संबधीत अधिकारी वआपला समावेश असावा या कामाची चौकशी करून आठ ते दहा दिवसात अहवाल सादर करावा अशी विनंती आहे.

मा.सभापती : माझ्या अध्यक्षतेखाली समीती गठीत करण्याची आवशता नाही. स.सदस्य व अधिक्षक अभियंता यांनी त्या त्या भागातील कामाची पाहणी करून माहिती सादर करावी अंमलबजवणी केली जईल.

श्री.रेणूकादास वैद्य : जी स्पील ओव्हरमधे कामे आलेली आहेत त्यास स्थायी समिति किंवा सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली असेल त्या सर्व कामांचा यातसमावेश आहे का?

मा.सभापती : बजेटबुक आपल्याकडे सादर केलेले आहे नसेल ते काम सूचवावे कार्यवाही होईल

श्री.रेणूकादासवैद्य : स्मशान मारूती ते जफरगेट या नाला सफाईचे काम सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले होते स्पील ओवरमधे कुठेही तरतूद केलेली दिसून येत नाही .

मा.सभापती : ज्या ज्या सूचना स.सदस्य करीत आहे याची नोंद ड्रेनेजव विदयूत कार्यकारी अभियंता यांनी घेवून खूलासा करावा

श्री.अजीजजगीरदार : बजेटमधे नेहरूभवनसाठी १ लक्ष तरतूद केलेली असून संत एकनाथ रंग मंदिरसाठी २५ लक्षची तरतूद केलेली आहे संत एकनाथ रंग मंदीर येथे सर्व सुविधा पुरविलेल्या आहेत.

कार्य.अभियंता(ड्रे.वि.) : स्मशान मारूती ते जफरगेट या नाला सफाईच्या कामासाठी स्पील ओवहरमधे तरतूद ठेवलेली नाही कारण ते काम रद्य करण्यात आलेले आहे व शाासनास तसे कळविले होते हायकोर्टात प्रकरण प्रलंबीत आहे कोर्टात जे ॲफीडेव्हीट सादर केलेले आहे त्यात स्पष्ट दिले आहे की या कामासाठी वेगळी तरतूद करण्यात येईल त्यासाठी या वर्षात ६० लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : विधीसल्लागार यांचा या संदर्भात खुलासा घ्यावा अशी विनंती आहे.

विधी सल्लागार : या संबधी मा. उच्च न्यायालयामधे श्री.संजय रामचंद्र शिंदे यांनी महानगरपालिका व स्टेट विरूध्द याचिका दाखल केलेली आहे याचिका क्र१४७५/२००५ मधे दाखल केलेली आहे.त्यांनी अशी विनंती केली आहे की जे महानगरपालिकेने नाला सफाईसाठी क्र २ आणि १२ मधे जे ५ लक्ष व२५ लक्ष तरतूद केलेली आहे असे ३० लक्षचे काम आचारसंहितेमूळे व इतर कारणामूळे किंवा पावसाळयामुळे पूर्ण होणार नाही,असे याचिकाकर्त्यानी कोर्टासमोर निवेदन केलेले आहे. ही जे कामे आहे ती तात्काळ प्रशासनाने पूर्ण करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने महानगरपालिकेला निर्देश दयावे अशी विनंती केली. प्रकरणाची मा.उच्च न्यायालयासमोर सुनावणी झाल्यानंतर महानगरपालिके तर्फे माहिती देण्यात आलेली आहे. या बाबत मागच्या वेळेस ज्या कामकाज संबधीच्या निविदा होत्या त्या स्टे करण्यात आलेल्या आहेत. अभियांत्रिकीचा रिपोर्ट सुध्दा मागविण्यात आलेला आहे.मा. न्यायालयाने सांगितले जे कुणी ही ज्या धरतीवर तंत्रज्ञानिक दृष्टीकोनातून हे कामकाज करण्यात येते तेथील माहिती घेवून सूध्दा हे कामकाजकरण्यात यावे.जरी नाले साफसफाईचे कामकाजअसले तरी ते वरच्या वर असू नये, नाल्यामधे ज्या ड्रेनेजलाईन असतील त्याची सूध्दा साफ सफाई करण्यात यावी. अशी अपेक्षा कोर्टाने महानगरपालिकेकडून व्यक्त केलेली आहे.एक आठवडयानंतर पुन्हा सुनावणीसाठी प्रकरण न्यायालयासमोर ठेवण्यात आलेले आहे.

कार्य.अभियंता(ड्रे.व वि.) : २९ लक्षची निविदा काढलेली होती ती रद्द केलेली आहे.

श्री.दिलीप गायकवाड : कर्मचाऱ्यांना बोनस देण्यासाठी या बजेटमधे तरतूद केलेली आहे का केली नसेल तर का केलेली नाही .

मा.सभापती : ज्या विषयावर चर्चा चालू आहे त्या विषया व्यतिरिक्त दुसऱ्या विषयावर बोलू नये.स्पिल ओवरच्या बाबतीत विषय चालू आहे त्यावर बोलावे.

श्री.कवरसिंग बैनाडे : ड्रेनेजचा विषय चालू आहे यामूळे आरोग्यास धोका पोहचू शकतो.सिडको एन ५ मधे मी स्वत: उभे राहून पाहणी केली अधिकाऱ्यांना दुरध्वनी केला

पाहणी केली परंतू काहीही कार्यवाही झालेली नाही याभागात महानगरपालिकेने म्हाडाची जी घरे आहे ती हस्तातंरण केलेली आहे.मा.आयुक्तांनी तेथे भेट दिली तर बरे होईल. सहयाद्रीनगर या भागात आजची स्थिती अशी की रस्त्यावरील पावसाचे पाणी हे ड्रेनेजच्या पाण्यात मिळून दिलेले आहे तेथील लोकांच्या घरामधे ड्रेनेजचे पाणी गेलेलेआहे आजची परीस्थिती आहे.हे अतिशय आरोग्यास धोकादायक आहे.यास कोण जबाबदार आहे. संबधीत अधिकारी यांना कल्पना दिली तर ते रस्ते विभागाच्या मार्फत सोडण्यात आलेले आहे.अधिकारी एकदुसऱ्या विभागाचे नाव दाखवितात हे थांबले पाहिजेव या संबधी तात्काळ कार्यवाही करावी अशी विनंती आहे

कार्य.अभियंता(ड्रे व वि.) :बैठक संपल्यानंतर या ठिकाणी पाहणी करून कार्यवाही करण्यात येईल.

श्री.कवरसिंग बैनाडे : आठ दिवसापूर्वी मी लेखी पत्र दिलेले आहे अति. शहर अभियंता यांना सूध्दा या संबधी कल्पना दिलेली होती. त्या ठिकाणी लहान गतिरोधक सारखे टेकाड जरी केले तरी पाणी ड्रेनेज मधे जणार नाही. मूख्य रस्त्यावरील पाणी येते तात्पूरती व्यवस्था होवू शकते. परंतू अधिकारी सांगतात गतिरोधक नको. परंतु या बजेट मधे पान क्र३१ वर बघीतले तर गतिरोधकसाठी १० लक्षची तरतूद ठेवलेली आहे लहान काम करण्यास टाळाटाळ होते.

मा.सभापती : स.सदस्यांनी गतिरोधकच्या बाबतीत सूचना केलेली आहे या संदर्भात हायकोर्टाचे आदेश मा.पोलीस आयुक्त यांना आलेले आहे मा.पोलीस आयुक्त यांनी ड्राईंग घेतल्यानंतर व त्या विभागाची मान्यता घेतल्यानंतरच मोठे स्पिड ब्रेकर टाकता येते.जर रस्त्याचीकामे महानगरपालिका करीत असेल व रस्त्याचे पाणी इतर ठिकाणी जत असेल तर त्या पासून नागरीकांना त्रास होत असेल तर असे लहान काम करण्यास हरकत नसावी हे काम करताच येत नाही असे म्हणणे चूकीचे होईल ते कोणत्यातरी पध्दतीने नियमात बसून करावयास पाहिजे.पर्यायी व्यवस्था केलीच पाहिजे

श्री कवरसिंग बैनाडे :कॉलनीतले मुख्य रस्ते असतात रस्त्याला जस्त उतार आहे लहान लहान गल्ल्या असल्यामूळे मुख्य रस्ते त्यास मिळालेले आहे.मेन रस्त्यावरील जे पावसाचे पाणी येते ते ड्रेनेजलाईन मधे जत आहे.ड्रेनेज लाईन लहान असल्यामूळे लोकांच्या घरात घाण पाणी जत आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : या संदर्भात आताच आपण चर्चा केलेली असून अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचलेले आहे. पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी कार्यवाही करण्याची गरज आहे. बजेटमधे सूध्दा यासाठी तरतूद ठेवण्याची आवशता असून अनेक रस्त्याला नॅचरल स्लोप असा आहे की लोकांच्या घरात पाणी जते अशा वेळी अग्निशमन दलाची गाडी बोलवावी लागते. पावसाचे पाणी ड्रेनेजमधे न जण्यासाठी उपाययोजना करण्याची गरजआहे.

मा.आयुक्त :पावसाचे पाणी ड्रेनेजच्या पाण्यास कनेक्ट होवू शकत नाही होत असेल तर पर्यायी व्यवस्था करता येईल.

श्री.मुजेब खॉन : टाकळकर सोसायटी ते मकसूद कॉलनी गटार बांधण्यात आलेली असून त्यावर जळया टाकलेल्या आहे व लोकांनी त्यावर अतिक्रमण केलेले आहे या

संदर्भात तीन पत्र मी दिलेले असून कार्यवाही झालेली नाही भविष्यात पाणी अडकल्यास पाणी रस्त्यावर येईल व महानगरपालिकेस पून्हा डबल खर्च येईल. याची दखल घेण्यात यावी. या संदर्भात तीन-तीन पत्र दिलेले आहे.

मा.सभापती :आताच स.सदस्य श्री.बैनाडे यांनी सहयाद्रीनगरच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला आहे तेथे प्रत्यक्ष मी पाहणी केलेली आहे दोन वर्षापासून तेथे पावसाचे पाणी अशा पध्दतीने वाहत जते की लोकांच्या घरातूनपाणी गेल्या शिवाय पाणीच जत नाही अशी परीस्थिती असतांना यांत प्रशासनाचा काही दोष नाही का.रस्ते करतांना त्याचा स्लोप हा व्यवस्थित काढलेला नाही पावसाचे पाणी वेगळया मार्गानेकसे वाहत जईल यासाठी तांत्रिक बाबी तपासून पाहाव्यात रस्ता उंच करण्याची गरज पडली तरी खर्च करण्यास आमची सम्मती राहील तसे अंदाजपत्रक करावे.प्रशासकीय अधिकाऱ्याना सूचना करण्यात येत आहे की सध्या पावसाचे दिवस असून पावसाचे पाणी वाहून जण्यासाठी ज्या नाल्या असतील, नाले असतील ते संपूर्ण ओपन करण्याच्या दृष्टीने कुणाच्या टपऱ्या असतील कुणाचे बांधकाम असेल ते काढून घेण्याची कार्यवाही करावी.

श्री.बारवाल गजनन : विकास नगर, एसबीएस कॉलनी या भागात अनेक अडचणी निर्माण झालेल्या आहेत या संदर्भात कार्यकारी अभियंता यांना पावसाळा सुरू होण्यापूर्वी सूचना दिली होती क्रांतीचौक पासून स्लोप आहे तो मोठया प्रमाणात आहे त्यामूळे गंभीर परीस्थिती निर्माण होते याकडे लक्ष देण्याची गरजआहे त्या ठिकाणी अग्निशमन दलाची गाडी बोलविण्यात आलेली होती. अशी परीस्थिती निर्माण झालेली आहे.

मा.सभापती : स.सदस्य श्री. बारवाल यांनी केलेली सूचनेचे गांभीर्य अधिकाऱ्यानी लक्षात घयावे.आता अर्ध्यातासासाठी सभा तहकूब करण्यात येते (सभा तहकूब दुपारी ३.०० वाजता पून्हा सभेला सुरूवात ३.४० वाजता)

श्री.रेणूकादास वैद्य : २३ कोटीची जी कामे स्पील ओवहरची आहेत ती एक वर्षात पूर्ण होणार आहे का?

मा.आयुक्त :स्पील ओवहरची जी कामे आहेत ती गेल्या वर्षीच मंजूर झालेली आहे परंतू काम बाकी होते म्हणून त्या कामातील काही रक्कमा या वर्षी खर्च होणार आहे त्यावर २३ कोटी खर्च होणार आहे ही कामे मागिल वर्षीच मंजूर केलेल्या कामातील हिस्सा आहे.या वर्षात सूध्दा मोठी कामे पूर्ण झाली नाही अर्धवट राहीली तर पूढच्या वर्षाच्या स्पील ओवहरमधे जणार आहे असे एकूण १७-१८ कोटीचे स्पील ओवर राहील.प्रत्येंक वर्षी स्पील ओवहर होतेच परंतू ते १०टक्के असू नये ४ ते ५ टक्के असावे.

सौ.लता दलाल :यात ३१ कोटीचीच कामे होतील असे दाखविण्यात आलेले आहे अनेक वार्डात मोठया प्रमाणात कामे व्हावीत म्हणून स.सदस्यांना अपेक्षा आहे. त्यांनी जी कामे दिलेली आहे ती सर्व करण्यात यावी.त्यासाठी या वर्षात ५० कोटीची ही भांडवली स्वरूपाची कामे करण्यात यावी अशी माझी मागणी आहे जेकाही स्पील ओवर असेल ते पूढील वर्षात घ्यावे.

श्री.बारवाल गजनन :महानगरपालिकेला निश्चित उत्पन्न किती होणार आहे ही वस्तुस्थिती कळाली तर जे आपण चर्चा करीत आहोत स्पील ओवरच्या बाबतीत यावर

काहीतरी निर्णय घेता येईल.जे बजेट ठेवलेले आहे ते चुकीचेच आहे कारण मागच्या वेळेसही जेउत्पन्न निश्चित केलेले होते तेवढे झालेले नाही म्हणून ही कामे स्पील ओवरमधे आलेली आहे.आताच मा.आयुक्तांनी खुलासा केला की स्पील ओवर हे पूर्ण पणे ॲडजेस्ट करू शकत नाही.थोड्या फार प्रमाणात मागे पूढे होणार आहे हे समोर आलेले आहे.

मा.सभापती :जमा बाजू बजेटमधे प्रशासनाने ठेवलेली आहे आपण सर्व चार दिवसापासून त्यावर अभ्यास करीत आहोत. आपण स्वत: सर्वसाधारणा सभेत मोठे अंदाजपत्रक मंजूर केलेले आहे.मागिल अंदाजपत्रकाचाआपणास अनूभव असेलच जवळपास ठेवलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न राहणार आहे तसे निश्चितपणे प्रशासन काम करेल.कोणती कामे घ्यायची कोणत्या कामांना प्राधान्य दयायचे यावर आपण चर्चा करावी आताच स.सदस्यासौ. लता दलाल यांनी ३१ कोटीची तरतूद विकास कामासाठी आहे ५० कोटीची करण्यात यावी यावर चर्चा करता येईल मार्ग काढू.

श्री.बारवाल गजनन :मा.सभापती आपण मत मांडले हे जरी सत्य असले तरी सत्य परस्थिती आपल्या समोर यावयास पाहिजे कारण रूपया येतो कसा व जतो कसा याची माहिती होणे आवशयक आहे सद्य परीस्थिती अशी की आपल्या लगेच लक्षात येईल की मालमत्ता कर व पाणीपट्टीची वसूली ही अतिशय कमी झालेली आहे मा.आयुक्तांनी कबूल केलेले आहे.

मा.आयुक्त : निश्चितपणे जस्तीत जस्त वसूली करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

मा.सभापती :वसूलीच्या बाबतीत प्रशासन अति उत्तम काम करणार आहे.आपण सर्व वार्डाचे लोकप्रतिनिधी म्हणून ज्यांच्याकडे थकबाकी असेल त्यांना पाठीशी न घालता त्यांना थकबाकी भरण्यास प्रवृत्त करावे जर कुणावर जस्त कर आकारण्यात आलेला असेल त्यांचेवर खरोखरच अन्याय होतो आहे प्रशासन त्रास देत असेल तर निश्चितपणे त्या व्यक्तीची बाजूघ्यावी परंतु ज्यांचेकडे ५-१०वर्षाची बाकी असेल तो बीलच भरणा करीत नसेल तर त्या नागरीकांनी ते बील भरणा केले पाहिजे ही भूमिका आपली असावी तर या शहराचा विकास होईल आणि जे पैसे भरतात ज्या भागात वसुली जस्त आहे त्या भागातील लोकांवर अन्याय होणार नाही.

श्री.रेणूकादास वैद्य : ज्या भागात १०० टक्के वसूली आहे त्या भागात जस्तीत जस्त कामे होण्यासाठी तरतूद ठेवावी वसूलीस आणखी चालना मिळेल. याचा विचार करावा.

श्री.गजनन बारवाल : स.सदस्य श्री वैद्य यांनीचांगला मुद्दा उपस्थित केला परंतु या भागात वसूली का जस्त होते तर हा भाग संपूर्णपणे अधिकृत आहे स्लम नाही शिवाय सुशिक्षित व मोठमोठे लोक राहतात शिवाय मोठमोठी घरे आहेत. मला सर्व याची जणीव आहे मीही त्या भागाचा माजे नगरसेवक होतो.तसेच एमएसईबीच्या संदर्भात एक प्रस्ताव शासनाकडे पाठविणार आहोत त्याचाही उल्लेख यात केलेला आहे.फुगिर बजेट दाखविण्यात आलेले आहे माझी पून्हा पून्हा विनंती आहे एमएसईबीचे महानगरपालिकेला खुप काही देणे बाकी आहे.येणाऱ्या दिवसात या विभागाकडून मोठया प्रमाणात हाणी होण्याची

शक्यता नाकारता येत नाही.आजपर्यंत पत्रव्यवहार झाले प्रस्ताव केले परंतू ते मान्य केले नाही बील भरण्यास असमर्थ ठरलो. हे सर्व आपणांस मान्य आहेत.भविष्यात येणारे धोके आहेत त्याकडे लक्ष वेधणे माझे कर्तव्य आहेत या विभागाने जे मागणी केलेली आहे ती जस्त आहे मोठी रक्कम एमएसईबीला देणे आहे.याकडे सुध्दा आपण लक्ष द्यावे .

श्री.रेणूकादास वैद्य : काही कामासाठी जे तरतूद बजेट मधे केलेली आहे तेव्हढी आवशक नाही असे मला वाटते. झाल्टा ट्रिटमेंन्ट प्लॅन्टमधे नेमके काय काम चालते.कामाची सूरूवात केंव्हापासून झाली आतापर्यंत काय खर्च झालेला असून भविष्यात ५० लक्षची तरतूद ठेवली त्यात कोणते काम होणार आहे माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : संबधित अधिकारी यांनी खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : झाल्टा शिवारामधे शहा टेक्नीकल कन्सल्टंट यांनी महानगरपालिकेला जे सेवरेज ट्रिटमेंट प्रोजेक्ट दिला होता त्यामधे १०.२८ एमएलडी क्षमतेचा एस.टी.पी. बांधवा म्हणून दिलेले होते त्यामूळे गेल्या दोन वर्षापासून महानगरपालिकेने हे काम हाती घेतलेले आहे. यात चार पॉंडस् बांधणे, ड्राय आणि वेट अशा दोन विहीरी बांधणे, तेथील पंपीग मशीनरी बसविणे तेथील पाईपलाईन बसविणे इ. कामांचा समावेश आहे. १३५ लक्षचा हा प्रोजेक्ट होता त्यापैकी आता सिव्हिल वर्कचे काम जवळपास पूर्ण झालेले असून ९५ टक्के काम झालेले आहे आतापर्यत ७० ते ७१ लक्ष खर्च झालेले आहे यानंतर आता पंपीग मशीनरी बसविण्याचे काम सुरू आहे.

सौ.लता दलाल : माझ्या माहितीनुसार ८९-९० च्या दरम्यान शहा कन्स्ल्टंट यांनी हा प्रोजेक्ट राबविला होता त्या अनुशंगाने हे आहे का शहा कन्सल्टंट यांनी जे रिपोर्ट दिला होता त्यानुसार आहे. त्या व्यवस्थित केलेल्या नाही अनेक ठिकाणी बेकार परीस्थिती त्या लाईनची झालेली असून नाल्यातून ड्रेनेजचे पाणी वाहते असे असेल तर या प्लॅन्टचा उपयोग काय खुलासा करावा.

अति.शहर अभियंता :शहरात जे पाणी वाहते आहे ते पाणी ट्रिटमेंन्ट करण्यासाठी शहरात एकच बनेवाडी येथे प्लॅन्ट आहे तो ही सध्या बंद अवस्थेत आहे. वाटर ट्रिटमेंन्ट करणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे.सिव्हर लाईन नंतर करणे अगोदर हा प्लॅन्ट तयार करणे नंतर पाणी तेथे घेवून जणे असा प्लॅन असल्यामूळे हे करणे आवशयक आहे.आपल्या निदर्शनार्स आणून देतो की मागे एकदा झाल्टा गावच्या लोकांनी ट्रॅक्टरद्वारे मोर्चा आणलेला होता. तो यासाठी आणलेला होता की सिव्हेजवाटर जे खाम नदीमधे वाहते आहे त्यास आज ट्रीट करू शकत नाही. आजच्या परीस्थितीत ते सिव्हेज वाटर तेथील विहीरीमधे मिसळून तेथील पाणी दूषित झालेले होते. त्यामुळे लोकांनी फार मोठा मोर्चा आणलेला होता. तो आपण ५०% जे ५.२८ कॅपॅसीटीचा बांधतो आहे.

मा.आयुक्त : जेव्हढे पाणी आपण शहरात आणतो त्याचे किमान ६० टक्के पाणी सिव्हरेजने ट्रिट होवून बाहेर जयला पाहिजेसध्या काहीच करीत नाही.दोन तीन वर्षात किमान ४० ते ५० एमएलडी पाण्याचे सिव्हरेजने ट्रिट होणे आवशक आहे.हे

जर केले नाही तर प्रदुषण नियंत्रन बोर्ड प्रशासनास सोडणार नाही. कार्यवाही होवू शकते.

सौ.लता दलाल : अगोदर सिव्हर लाईन टाकून जेथे ट्रिटमेंन्ट प्लॅन्ट तयार केला जईल तेथे त्या सिव्हर लाईनचे पाणी सोडले जते अशी माझी माहिती आहे.माझ्या माहिती प्रमाणे आज सिव्हरेज लाईन नाहीत डायरेक्ट नाल्यातून पाणी वाहत जते.आणि तो ट्रिटमेंन्ट प्लॅन्ट आजच्या परीस्थितीत कितपत योग्य ठरेल.माझ्या माहितीनूसार ८९-९० च्या दरम्यान सिवरेज लाईनसाठी एक ते दोन कोटी रूपये खर्च केलेले होते.आज त्या लाईनस् ५० ते ६० टक्के कामात येत नाहीत.

श्री.रेणूकादास वैद्य : बोलण्याचा उद्‌देश हाच की आपण ज्या कामासाठी हा प्लॅन्ट करीत आहोत तो सक्सेस होत नाही सिवर लाईनच नाही तर त्यात पाणी जणार कसे हा मुद्दा आहे.तिथपर्यंत पाणी पोहचत नाही तर हा प्लॅन्ट करून उपयोग काय असा मुद्दा आहे.दोनवर्षात त्यावर ६५ लक्ष खर्च केलेले आहे. आतापर्यत काय फायदा झालेला आहे.

मा.आयुक्त : जेवढे पाणी शहरात येते त्यापैकी किमान ६० ते ७० टक्के पाणी बाहेर जतेच त्यासाठी ट्रिटमेंन्ट प्लॅन्ट करणे आवशक आहे.

मा.सभापती : ड्रेनेजच्या पाण्याच्या बाबतीत जे मा.आयुक्तांनी खुलासा केला त्यास आम्ही सर्व सभागृह सहमत आहोत.हा प्लॅन्ट चालू केला पाहिजे कार्यवाही झाली पाहिजे असे सर्व सदस्यांचे मत आहे महापालिकेच्या हद्यीत बनेवाडी येथे एक ट्रिटमेंन्ट प्लॅन्ट असून हा दोन नंबरचा प्लॅन्ट होत आहे.बाजूला सिडको वसाहत असून तेथे दोन प्लॅन्ट ऑलरेडी झालेले आहेत. ते प्लॅन्ट कार्यान्वित राहू शकतात महापालिकेचेच का राहू शकत नाही.एक दुर्दैव आहे. पैसे खर्च करण्यासाठी या सभागृहाचा विरोध नाही परंतु जे काही काम होते, करण्यात येते त्याचा उपयोग होत नसेल तर जे काही मत व्यक्त केलेले आहे ते गैर आहे असे वाटत नाही. हा प्लॅन्ट करणार आहोत त्या नुसार एमआयडीसी पासून चिकलठाणा गाव ते झाल्टा असा प्रकारे ही सिव्हर लाईन आहे व हा प्लॅन्ट झाल्टा येथे होत आहे.मी सर्व्हे केलेला आहे झाल्टा पर्यत आजही अशी परीस्थिती आहे की पाणी लोक जवू देत नाही.नवीन टाकलेली सिवर लाईन हिची सुध्दा दुरावस्था झालेली दिसून येते.नुसते काम करायचे व त्यांचा सांभाळ करायचा नाही ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे हे प्रशासनाच्या निदर्शनास आणून देतो. उपअभियंता ड्रेनेजचे श्री.काझी साहेब उपस्थित आहे त्यांनी हर्सूल गावाच्या जातच्या ड्रेनेज लाईनचा सर्वे केलेला होता.२० ते २५ लक्ष खर्च करून केलेली लाईनचा गावाच्या लोकांना फायदा होत नाही १८ खेडी गावाचा समावेश केलेला आहे, त्यात हर्सूल गाव येते या कामासाठी अनेक वेळा बजेट ठेवण्यात येते परंतू त्याची देखभाल केली जत नाही.आजही पाहणी केली तर संपूर्ण ड्रेनेज लाईन फुलेनगरपासून हर्सूल गावच्या देवीच्या प्रांगणापर्यंत संपूर्ण नाल्यामधे ओपन वाहते आहे.स.सदस्याच्या भावना लक्षात घेवून या मशीनरी बसविणार असेल व त्यांची देखरेख करणार असेल व पाणी ट्रिटमेंन्ट प्लॅन्ट पर्यंत पोहचत असेल तर त्यावेळीच हे काम करावे नसता

कर्मचाऱ्यांचा खर्च त्या ठेकेदारांचा खर्च पून्हा महापालिकेस येईल असे काम करण्यात बाबत निर्णय घेवू नये महापालिकेच्या पैशाचा दुर्पयोग होणार नाही याची काळजी घ्यावी असे सर्वांचे मत आहे.आता पाणी पूरवठा अधिकारी यांनी खूलासा करावा की स्पिल ओवरची किती कामे करावी लागतील व किती कामे कमी करता येतील यांचा खुलासा करावा.

कार्य.अभियंता(पापू) : १.७४ कोटीची पाणी पुरवठयाची कामे कमी करता येवू शकतील परंतु १.५० कोटीची कामे जयकवाडीपासून ते शहरापर्यत ९ ते १० एमएलडी पाणी वाढविण्यासाठी नवीन पंप बसविण्यासाठी खर्च होणार आहे.

मा.सभापती : विद्युत लाईन वरील किती बजेट कमी करता येईल अधिकारी यांनी खूलासा करावा.

कार्य.अभियंता(ड्रे.व.वि.) : जलनिस्सारण व विदयूत यावर स्पील ओवहरची कामे ही ४.१४ कोटी आहेत यातून काहीही कमी करता येणार नाही.

श्री.रेणूकादास वैद्य : देखभाल दुरूस्तीवर माझयामाहिती प्रमाणे सव्वा कोटीची खर्च होते परंतू आज्ही अशी परीस्थिती आहे की शहरात ७० टक्के लाईट बंद आहेत असे असतांना ही परीस्थिती असेल तर या विभागाचे खाजगीकरण करावे नसता तरतूद असूनही ही अवस्था असेल तर बजेट कमी करावे .

कार्य.अभियंता(विद्युत) : पूर्ण शहराचे लाईटचे खाजगीकरण करण्याच्या ठरावास मा.आयुक्तांनी शिफारस स्थायी समितीकडे केलेली आहे पूढील स्थायी समितीच्या सभेत तसा प्रस्ताव सादर होईल.

श्री.शशांक विसपुते : दरवर्षी औषध खरेदीवर खर्च बघीतला असता असे दिसून येईल की सन २००२-०३ मधे २.२५ लक्ष तर ०३-०४ मधे ५१ हजर सन ०४-०५ मधे २.७४ लक्ष असे दिलेले असूनमागे एन ११ व एन ८ च्या दवाखान्यात जस्तीची आषधी दिसून आलेली होती.या वर्षीच्या अर्थसंकल्पात १२ लक्ष दिलेले आहे काही टक्केवारीमधे वाढ होणे आवशक होते परंतू मोठया प्रमाणात या वर्षी तरतूद केलेली दिसून येईल ऐवढी रक्कम आवशक आहे का ?तसेच सार्वजनिक दवाखाने यासाठी औषधी खरेदीवर तीन ते चार पटीने जस्त तरतूद केलेली आहे.तसेच कुटूंब कल्याण यावर ही जवळपास १० पटीने जस्त तरतूद ठेवण्यात आलेली आहे.कूटूंब कल्याणसाठी शासनाचे अनुदान सुध्दा मिळते प्रत्येक वर्षी १० ते २० टक्केनी वाढ होत गेलेली आहे परंतू या वर्षीच एवढया मोठया प्रमाणात वाढ का करण्यात आलेली आहे मागिल काळात तरतूद का कमी ठेवण्यात येत असे.

मा.सभापती :स.सदस्य श्री.शंशाक विसपूते यांनी या वर्षीसाठी जस्त तरतूद ठेवलेली आहे ती कशासाठी असा मुद्दा उपस्थित केलेला आहे तसेच गेल्या १५ दिवसापूर्वी काही दवाखान्यात जस्तीचा स्टॉक एक्स्पायर झालेला दिसून आलेला आहे याचा ही उल्लेख केलेला आहे.अधिकृत माहिती अशी की गेल्या तीन वर्षामधे महापालिकेने कोणत्याही एजन्सीकडून औषधी खरेदी केलेली नाही डायरेक्ट कंपनीकडून औषधी खरेदी करण्याचा ठराव पारीत केलेला होता त्यानूसार डायरेक्ट एमआरपी रेटप्रमाणे औषधी महापालिकेस कंपनीकडून मिळत आहे.स्टाफच्या बाबतीत सांगण्यामध्ये थोडेसे चुकीचे झाल्यामुळे बऱ्याचशा

बाबीचा यात आंतरभाव आहे.पर्चेसींगच्या बाबतीतली ही वस्तुस्थिती आहे. या वर्षी जी तरतूद केलेली आहे तेवढी आवशकता आहे का याचा खुलासा अधिकारी यांनी करावा.

आरोग्य वैद्य. अधिकारी : स.सदस्य व मा.महापौर एन ११ येथील दवाखान्यामधे गेले असता तेथे ऑक्टोबर २००५मधे एक्सपायर असेलेले ७०० बॉटल आहेत आणि ती खरेदी सर्व २००२-०३ मधील रोजबाग व साथरोगाची परीस्थिती लक्षात घेवून २००२ मधे खरेदी करण्यात आलेली असून त्यानंतर आरोग्य विभागामार्फत सलायन्स खरेदी करण्यात आलेली नाही. हे २००५ ऑक्टोबर मधे एक्स्पायर होणार आहे.पूर्वीचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी ते खरेदी केलेले आहे अदयाप ते सलायन्स एक्सपायर झालेले नाही.दर वर्षी एफएस च्या टॅबलेट आहेत यासाठी प्रत्येक वर्षी केद्र शासनाकडून लहान मूलासाठी ३.कोटी टँबलेट पूरवठा होतात तीन वर्षीत साथ रोग कमी झालेले आहे मागिल वर्षी सार्वजनिक आरोग्यसाठी ५० लक्षची तरतूद ठेवली तेवढी औषधी खरेदी करावी लागत नाही जेव्हा मा.आयुक्त यांनी खाते प्रमुखाची बैठक घेतली तेव्हा असे सांगितले की औषधीसाठी एवढी रक्कम लागू शकत नाही म्हणून या वर्षासाठी सार्वजनिक आरोग्य यासाठी ३० लक्षची तरतूद ठेवलेली होती १० लक्ष कमी केले २० लक्षची च तरतूद ठेवलेली होती शासनाकडून औषधी मिळते .मलेरीयाची जी औषधी असते ती शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानातून फक्त८० ,०००/- रूपयाची औषधी खरेदी केलेली आहे.

सौ.लता दलाल : आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी संपूर्ण व्यवस्थीत माहिती दयावी सभागृहाची दिशाभूल करू नये.वर्षभरामधे किती औषधी लागतात .सलायन किती टॅबलेट किती लागतात.तसेच ज्या उपचार केलेले जतात त्यावर वेगवेगळया प्रकारची औषधी किती लागतात या सर्वाचा खुलासा करण्यात यावा.शासनाकडून किती मिळते तसेच जगतिक आरोग्य यांचेकडून किती अनुदान येते किती रक्कम त्यातील शिल्लक आहे जे औषधी खरेदी केली ती वाया गेलेली आहे की वापरातच आलेली नाही.ती जर वापरात गेलेली नसेल तर या वर्षी कशासाठी दाखविणयात आलेली आहे. असे अनेक प्रश्न आहे.योग्य तो खुलासा करावा.

श्री.शशांक विसपुते : यापूर्वीच्या बजेटमधे जे आकडेवारी दिलेली आहे त्यापेक्षा तीन पटीने या वर्षी बजेट वाढवून दिलेले आहे पान क्र २८-२९ वर आपल्या निदर्शनास येईल मलेरीयासाठी गेल्या वर्षी पावने तीन लक्ष तरतूद होती या वर्षी १२ लक्ष ठेवलेली आहे सार्वजनिक आरोग्यासाठी चार लक्ष दोन लक्ष अशी तरतूद असायची यावेळेस २१ लक्षची तरतूद ठेवण्यात आलेली आहे.तसेच आयुर्वेदिक दवाखाना यासाठी १ लक्षची तरतूद ठेवलेली आहे हा दवाखाना कुठे आहे याची सूधदा माहिती देण्यात यावी.कूटूंब कल्याणसाठी जे औषधी लागते ती या वेळेस १० पटीने जस्त तरतूद केलेली आहे.लस खरेदीसाठी ५० हजराची तरतूद होती या बजेटमधे ७ लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे.

आरोग्य वैद्य अधिकारी: मलेरीया विभागाची जी औषधी दाखविलेली आहे ती शक्यतो महापालिकेला खरेदी करावी लागत नाही.अनुदानाच्या माध्मातून कार्यवाही होते.

मा.सभापती : गत दोन वर्षापूर्वीची जी तरतूद ठेवत आलेलो आहोत या विभागासाठी त्या वर्षीच्या तुलनेत या वर्षी जस्त तरतूद कोणती परीस्थिती समोर ठेवून ठेवलेली आहे असा प्रश्न स.सदस्यांचा आहे तेवढाच खुलासा करण्यात यावा.

आरोग्य वैद्य अधिकारी: मागिल वर्षी मलेरीयासाठी २ लक्षची तरतूद ठेवलेली होती या वर्षी १० लक्ष दर्शविण्यात आलेली आहे ही औषधी शासनच पर्चेस करून देते त्यांचेकडून जी मागणी केलेली असून मूळ अंदाजेत त्यांचेकडून येणारी रक्कम दाखविलेली आहे.मलेरीया ची औषधी ही शासन पर्सेस करते इतर औषधी महापालिकेलाच खरेदी करावी लागते.

मा.आयुक्त : बजेटमधे तरतूद करतो परंतू पूर्णत: खर्च होत नाही मागिल वर्षी फक्त १३ लक्षच खर्च केलेले होते.यावर्षी सुध्दा ३० ते ४० लक्ष तरतूद करणार होतो परंतु खर्च कमी होतो म्हणून २० लक्षची तरतूद ठेवण्यात आलेली आहे.मागिल वर्षी सार्वजनिक आरोग्यासाठी १३ लक्ष खर्च झालेले होते या वर्षी किमान २० लक्षची तरतूद ठेवणे आवशक आहे. सार्वजनिक कचऱ्याची विल्हेवाट यासाठी रक्कम जमा होते त्यात ज्यापैकी ७९ टक्के लोकांना पैसे परत करतो.मागिल वर्षी १० लक्ष जमा झालेले होते या वर्षी जस्त डॉक्टरांचा समावेश करून घेवून २० लक्ष जमा होवू शकतील यातून फक्त २१ टक्केच पैसे महापालिकेकडे जमा असतात.यातून जमा रक्कम वाढणार खर्च रक्कम सुध्दा वाढणार आहे.जे ४२.५० लक्ष दिसतात त्यातून फक्त २० लक्षच मिळणार आहे.तसेच फवारणी मशीन दुरूस्तीसाठी १ लक्ष रूपये ठेवलेले आहेत. २ लक्षचे १० लक्ष कसे झाले याबद्दल आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे खुलासा करतील.

श्री.शशांक विसपुते : औषधी विकत घेत नाही तर १० लक्षची तरतूद कशासाठी ठेवलेली आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : जेवढी रक्कम आवशक आहे तेवढीच नमूद का केलेली नाही मोठमोठे आकडे नमूद केलेले आहे.

मुख्यलेखाधिकारी : तरतूद करण्यात येते परंतू जेवढी औषधी पर्चेसींग होते तेवढाच खर्च होतो उर्वरीत रक्कम शिल्ल्क राहते.बजेटमधे २० लक्षचीच तरतूद ठेवलेली आहे गेल्या वर्षी फक्त १३.६० लक्षच खर्च झालेले आहे.या वर्षी त्यापेक्षाही कमी होवू शकतो किंवा २० लक्षच्या मर्यादित होवू शकेल.तरतूदी केलेल्या असतात प्रत्यक्षात खर्च हा कमी जस्त प्रमाणात झालेला असतो.जस्त होत असेल तर सूधारीत बजेटच्या वेळेस पूनश्च मंजूर करून घेत असतो.

मा.आयुक्त : मलेरीया साठी १० लक्षची तरतूद केलेली असेल त्यावेळी दोन लक्षच खर्च झालेले आहे कारण शासनाकडून औषधी प्राप्त झाल्यानंतर खर्च कमी येतो.

श्री.दिलिप गायकवाड : शासनाकडून जे औषधी येते त्यांचा पूर्ण उपयोग होतो का की ती औषधी परस्पर विक्री केली जतात.

सौ.लता दलाल : मागिल वर्षी २ लक्षची तरतूद औषधी खरेदीवर या वर्षी १० लक्ष ठेवण्यात आलेली आहे पाच पटीने रूग्ण संखया वाढणार आहेत का

मा.आयुक्त : खर्च होईल यानुसार आरोग्य विभागासाठी तरतूद ठेवतो परंतू शासनाकडून औषधी उपलब्ध झाल्यानंतर खर्च कमी होतो.मागिल वर्षी सूध्दा २ लक्षच प्रत्यक्षात खर्च झालेला आहे तरतूद १० लक्ष होती या वर्षी १० लक्षची तरतूद

केलेली आहे त्यातून २ लक्ष किंवा ३ लक्ष किंवा १० लक्ष खर्च होवू शकतो कारण शासनाकडून येणारी औषधीवर अवलंबून आहे. गेल्या वर्षी ३० लक्षची तरतूद ठेवलेली होती फक्त १३ लक्ष खर्च झालेले आहे एकदम शासन औषधी कमी करणार नाही म्हणून या वर्षीच्या अंदाजपत्रकात २० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे. यात असे की गेल्या दोन तीन वर्षीत शासनाकडून औषधी येते त्यामूळे २ ते ३ लक्षमधेच खर्च होतो.

श्री.दिलीप गायकवाड : कुटूंब नियोजनाच्या खर्चात १० टक्केनी वाढ केलेली आहे ती २० टक्के करावी व गेल्या वर्षी किती कुटूंब नियोजनाचे काम डॉक्टरांनी केलेले आहे याची माहिती देण्यात यावी.

श्री.रेणूकादास वैद्य : गेल्या तीन चार तासापासून चर्चा बजेटवर करीत आहोत सर्वांचे एकच मत आहे की महापालिकेकडे जमा होणारा पैसा हा जनतेच्या कष्टातून श्रमातून जमा होतो त्यांचा चांगला विनियोग व्हावा हीच सर्वाची अपेक्षा आहे. स्पील ओवहरची बरीच कामे कमी करून जशी चर्चा झाली त्या प्रमाणे स.सदस्यांनी सूचविलेल्या कामांचा समावेश करता येईल.भूसंपादनासाठी १५ कोटीची तरतूद केलेली आसून एवढी रक्कमेची गरजपडणार नाही असे वाटते.यासाठी १० कोटीची तरतूद ठेवली तर ५ कोटी विकास कामासाठी वापरता येतील.जयकवाडीच्या आपतकामासाठी १.११ कोटीची तरतूद ठेवलेली आहे मागिल दोन तीन वर्षात कोणती आपत कालीन घटना घडलेली नाही म्हणून ११ लक्षचीच तरतूद ठेवावी १ कोटी विकास कामासाठी घेण्यात यावे.तसेच जकात मधे १ कोटीची वाढ करावी त्यामूळे बऱ्याच नगरसेवकांच्या विकास कामांना संधी मिळू शकेल.तसेच मालमत्ता कर तसेच पाणी पट्टी करामधे ५ कोटीची वाढ करण्यात यावी.नगररचना विभागाचे ६० लक्ष रूपये आवक मधे गृहीत धरलेले आहे परंतू विविध दंडात्मक कार्यवाही करणार आहोत १ कोटीचे उद्‌दीषट देण्यात यावे.परवाच्या सर्वसाधारण सभेत दंडात्मक कार्यवाही करण्याचा निर्णय घेतलेला आहे त्यापासून किमान ५ कोटी रूपये वसूल होवू शकतील त्यांचा या बजेटमधे कोठेही उल्लेख केलेला नाही.सुशोभिकरणासाठी जे४१ लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे सदरचे काम हे उदयान विभागामार्फत करण्यात यावे शहर सुंदर व हरीत करण्यात कूणाचेही दूमत नाही.प्रशासनाने प्रस्तावित केलेली कामे तसेच स्पील ओवहरची कामे यावरील फिक्स अशी रक्कम जी लागेल ती निश्चित करावी ३० ते ४० टक्के रक्कम शिल्लक राहील त्यामधे नगरसेवकांनी दिलेल्या कामाचा समावेश करून या सर्व कामांना या बजेटमधे तरतूद करावी सर्व सदस्यांनी मा.सभापती यांचेकडे यादी दिलेली आहे.त्यानूसार सर्व कामे करण्यात यावी.

श्री.दिलीप गायकवाड : जकातीचे उद्दीष्ट १० कोटीने वाढवून देण्यात यावे.

श्री.विनायक पांडे :चांगल्या व मौलीक सूचना स.सदस्य श्री रेणूकादास वैद्य यांनी केलेल्या आहेत जयकवाडीपासून पाईपलाईन टाकायची आहे त्यासाठी १ कोटीची तरतूद ठेवावी व शहरातील ज्या लहान लहान पाईप लाईन बदलावयाच्या आहेत यात नमूद केलेले आहे त्यासाठी महापालिकेने एकत्रित सर्व पाईप

एकाच कंपनीकडून पर्चेस करावे महानगरपालिकेकडे मोठमोठे गोडावून आहेत तेथे ते ठेवता येतील व लागेल तसे कामाच्या वेळी वापर करता येतील यात महानगरपालिकेची मोठी बचत होऊ शकते असे माझे मत आहे.

श्री.मुजीब खान : तीन चार तासापासून बजेट या विषयावर चर्चा चालू आहे अधिकारी यांनी प्रत्येक प्रश्नावर खुलासा केलेला आहे.हर्सूल तलावातून या शहराला पाणी पूरवठा होतो परंतु या योजनेच्या देखभाल दुरूस्ती व इतर कामासाठी या बजेटमधे तरतूद ठेवण्यात आलेली नाही.भविष्यात काही काम करावयाचे झाल्यास काहीना काही तरी तरतूद असणे आवशक आहे.५० लक्षची तरतूद करण्यात यावी.जवळपास सर्वच सदस्यांनी आपआपल्या वार्डातील नवीन काही कामे करण्या संदर्भात यादी सादर केलेली आहे.जेयात आलेले नाही त्या संबधी पत्र दिलेले आहे त्यात कमी जस्त करून यात समावेश करून ती कामे घेण्यात यावी. आपण ती सर्व कामे समावेश करून घ्याल अशी सर्वच सदस्यांची अपेक्षा आहे.व ही आजची बैठक ताबडतोब संपविण्यात यावी अशी विनंती आहे.

श्री.अजीजजगीरदार : प्रशासकीय खर्च हा २.२५ कोटीचा दाखविण्यात आलेला आहे वाहन डिझेज व वाहन दुरूस्ती यावर इतका खर्च अपेक्षीत आहे का.२० ते २२ वाहने आहेत त्यावर इतका खर्च करणे बरोबर नाही.पान क्र २६ वर १.२५ कोटी व पुन्हा १.०० कोटी असे दाखविलेले आहे.

मुख्यलेखाधिकारी : वाहने इंधन देखभाल दुरूस्ती म्हणून दिलेले आहे यात एकूण १२५ वाहने येतात कचऱ्याची वाहने सुध्दा आहेत. पान क्र २६ वर जे १.२५ कोटी दाखविलेले आहे यामधे दर महिण्याला इंडियल ऑईल कार्पोरेशन कडून १२ हजर लिटरचे डिझेल टँकर पर्चेस करतो.आपल्याकडे स्वतंत्र डिझेल पंप आहे यांत्रिकी विभागाकडे हा त्या बाबतीतला खर्च असून उर्वरीत १ कोटी हा देखभाल दुरूस्तीचा खर्च दाखविण्यात आलेला आहे.

श्री.अजीजजगीरदार : यापेक्षाही वाहने आणखी कमी करू शकत नाही का बरेच अधिकारी असे आहे की त्यांना घर ते ऑफिस व ऑफिस ते घर असाच प्रवास असतो. त्यांना साईटवर जवे लागत नाही.वाहना वरील खर्च कमी करावा.

मा.आयुक्त : कमीत कमी खर्च करता येईल.

श्री.दिलीप गायकवाड : महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना प्रत्येक वर्षी बोनस मिळत असे परंतु मा प्रकरण न्याय प्रविष्ठ झाल्यामूळे बोनस देणे बंद झालेले होते.आता त्या प्रकरणाचा निकाल लागलेला आहे म्हणून येणाऱ्या दिवाळीचा बोनस देण्यासाठी या बजेटमधे १ कोटीची तरतूद ठेवावी अशी सभागृहाच्या वतीने विनंती करतो.

श्री.अजीजजगीरदार : नेहरूभवनसाठी १ लक्षची तरतूद केलेली आहे त्यात वाढ करावी.

शहर अभियंता :१ लक्ष ही टोकन रक्कम ठेवण्यात आलेली आहे. तेथे बीओटी पध्दतीने कार्यवाही करण्याचा विचार चालू आहे.

श्री.रविकान्त गवळी : पाणी पूरवठयाची जे कामे केली जतात ती कामे करीत असतांना संबधीत ठेकेदार योग्य चांगल्या प्रतीच्या पाईप टाकतो की नाही याची कल्पना नाही परंतु नवीन पाईप टाकतांना जे पाईप लागणार आहे ते महापालिकेने एकत्रित पर्चेस करून कार्यवाही करावी.

श्री.अजीजजगीरदार : पान क्र २ वर नमूद केलेकी गुंठेवारी अंतर्गत होणारी वसूली ही २० लक्ष दाखविण्यात आलेली असून खर्च किती होणार आहे हे दाखविण्यात आलेले नाही.आणि गुठेवारीमधे किमान २ कोटी वसूली झाली पाहिजे

सौ.लता दलाल : जवळपास ६० ते ७० टक्के नगरसेवक यांचे वार्डात अनधिकृत वसाहती आहेत त्या वसाहतीत कामे करण्यात शासनाची मनाई असली तरी कमीत कमी या बजेटमधे अशा भागात देखभाल दुरूस्तीसाठी कामे करण्यासाठी २ कोटीची तरतूद करण्यात यावी

श्री.कवरसिंग बैनाडे : सिडको हडको तील नागरीकासाठी नाटयगृह असावे यासाठी टोकन रक्कम म्हणून ५ लक्षची तरतूद करावी तसेच गरवारे क्रिडा संकुलनात जलतरण तलाव आहे त्यासाठी ५ लक्षची टोकन रक्कम ठेवण्यात यावी.

मा.आयुक्त : विभागीय क्रिडा संकुल जे आहे ते विभागीय आयुक्त यांचे मार्फत होत आहे.त्यामधे ज्या सोयीसूविधा नसतील त्या करण्यात येतील कारण एकाच शहरात दोन ठिकाणी कामासाठी खर्च करणे बरोबर नाही.

श्री.कावडे साहेबराव : या शहरात अनधिकृत वसाहती ११४ आहेत त्या भागात सुविधा देण्यासाठी दोन कोटीची तरतूद आताच स.सदस्या सौ. दलाल यांनी सूचविल्या प्रमाणे ठवेणार आहात परंतु सध्यात शहरात पाऊस मोठया प्रमाणात पडत असून अनधिकृत वसाहतीत जणे शक्य होत नाही चिखल झालेला असून रस्ते चांगले होण्यासाठी त्या रस्त्यावर मुरूम वगैरे टाकण्यासाठी बजेट मधे तात्पूरती ३ लक्षची तरतूद करण्यात यावी.

श्री.शशांक विसपुते : अनधिकृत भागात टँकरद्वारे पाणी पूरवठा होतो सध्या या भागात पावसामूळे चिखल झालेला आहे टँकर जवू शकत नाही. मूरूम टाकण्यासाठी तरतूद करावी

श्री.मुजेब खॉन : अधिकृत अनधिकृत हे नाव पडलेले आहे परंतू महापालिकेस संपूर्ण भागातून मालमत्ता कर मिळतो आहे अशा वस्तीला अनधिकृत वस्ती.म्हणता येत नाही.जुन्या शहरात काम करावयाचे झाल्यास अधिकारी सांगातात गुंठेवारीमधे आहे जुन्या शहरात कोणतीही नवीन वस्ती बसलेली नाही .जेजुने शहर आहे ते अनधिकृत नाही.त्यानंतर महानगरपालिका झालेली आहे.ज्या वस्त्या २५ वर्षापूर्वीच्या आहेत त्या गुंठेवारीमधे येवू शकत नाही.

श्री.शशांक विसपुते : काही वसाहतीमधे पाण्याचे टँकर जत नाही त्या लोकांनी पाण्याविना राहावे का?

श्री.मुजेब खॉन : जुन्या शहरात कोणती वस्ती ही गुंठेवारीमधे येते अधिकारी गुंठेवारीच्या नावाखाली काम करीत नाही जुन्या शहरात कोठेही नवीन वस्ती नाही शहराच्या बाहेरील जी नवीन वस्ती आहे त्या अनधिकृत असू शकतात. जी वस्ती २५ वर्षापासून स्थायिक आहे ती गुंठेवारीमधे कशी येवू शकते जुन्या शहरात कोठेही अनधिकृत वस्ती नाही अधिकृत म्हणूनच घोषित करावे या वस्तीमधून पाणीपट्टी तसेच मालमत्ता कर वसूल केला जतो.

मा.सभापती : अनधिकृत भागात पाणी पूरवठा टँकरद्वारे होत असेल तर टँकर जण्यासाठी रस्ता करण्याची व्यवस्था करण्यात येईल.कोणतीही अडचण येणार नाही.

श्री.रेणूकादास वैद्य :चार पाच तासापासून या विषयावर चर्चा चालू आहे अतिशय महत्वपूर्ण असे मूद्‌दे स.सदस्यांनी आपल्या निदर्शनास आणून दिलेले आहे त्यावर गांभीर्याने विचार करावा.जे कामे स.सदस्यांनी आपल्याकडे दिलेली आहे ती दुरूस्त करून ती सर्व कामे अर्थसंकल्पात समाविष्ट करून घेण्यात यावी.

सौ.लता दलाल : प्रत्येक स.सदस्यांनी आपआपल्या सूचना या ठिकाणी केलेल्या आहेत. भांडवली कामासाठी या बजेटमधे ५० कोटीची तरतूद करावी वेगवेगळया वार्डात विकास कामे होतील.त्यात १८ ते २० कोटीची ही स्पील ओवरची कामे येतील.व ज्या ठिकाणी अनधिकृत वस्त्या असतील तेथे काम करता येत नसतील अशा ठिकाणी जे २ कोटीची तरतूद करायची आहे त्यामधून ती कामे करावी.जे कामे नगरसेवकांनी आपआपल्या वार्डात करण्यासाठी यादी दिलेली आहे त्या कामासाठी या बजेटमधे तरतूद करण्यात यावी व ती कामे करण्यात यावी व या बैठकीत सर्वांनी सहकार्य केले अधिकाऱ्यानी सुध्दा चांगली उत्तरे दिली तसेच मा.आयुक्त तसेच मा.सभापती यांना विनंती की जे आम्ही स.सदस्य बोलत आहोत ते ९८ नगरसेवकांच्या वतीने बोलत आहोत जे कामे आपणाकडे देण्यात आलेली आहे ती सर्व होतील अशी अपेक्षा करते.

श्री.बारवाल गजनन : जे बजेट मा.आयुक्तांनी सादर केलेले होते ते एक ऐतिहासिक असे बजेट होते.त्यात ठळक अशी काही वैशिष्टे आहेत महिला व बाल कल्याण समिती साठी ५० लक्षची तरतूद केलेली आहे.तसेच सन्मान व पारितोषिक यासाठी ३ लक्षची तरतूद केलेली आहे जेंव्हा महापौर स्पर्धा आपण सूरू केल्या होत्या तेंव्हा बजेट फार कमी होते परंतू या बजेटमधे प्रथमच ३०.७० लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे.वाचनालयासाठी सुध्दा पुस्तके खरेदीसाठी १५ लक्षची तरतूद केलेली आहे शालेय विदयार्थ्यांना गणवेश साठी ५० लक्षची तरतूद केलेली आहे हे सुध्दा अतिशय महत्वाचे आहे एकीकडे आपण हे सर्व काही करीत असतो सर्वांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे परंतू ही जबाबदारी फक्त सभापती यांचीच नाही तर सर्व या सभागृहात बसलेले सदस्य यांची सुध्दा व याशहराचे संपूर्ण नागरीक यांची सुध्दा जबाबदारी आहे. आपल्या घरातल्या वस्तू व साहित्य हे चांगले ठेवायला पाहिजेशहरात महानगरपालिके मार्फत पैसा खर्च करतो लाईटसाठी , चौक सुशोभिकरण करणे ,रस्ते करणे ,पाणी पूरवठा करणे ई. सुविधा देत असतो हा नागरीकांचाच पैसा असतो तो खर्च करतो.ज्या ज्या सूचना स.सदस्यांनी केलेल्या आहेत त्याची दखल जर प्रशासनाने घेतली तर निश्चितपणे महानगरपालिकेला याचा फायदा होईल यात शंका नाही.जेस.सदस्यांनी आपल्याकडे जेप्रस्ताव दिलेले आहे ते निश्चितपणे पूर्ण कसे होतील याकडे गांभीर्याने लक्ष दयावे या अर्थसंकल्पास मंजूरी देण्यात यावी.

मा.सभापती : सन२००५-०६ या वर्षाचे बजेट प्रशासनामार्फत सादर करण्यात आलेले होते त्यावर सर्व सदस्यांनी सविस्तरपणे चर्चा करून शहराचा विकास व सर्वसामान्य व्यक्तीच्या मुलभूत गरज कशा पूर्ण होतील यावर सविस्तर अशी चर्चा केलेली आहे.सर्वांना समान न्याय देण्याच्या दृष्टीने व काही प्रशासनामधील तृटी आहेत त्याही निदर्शनास आणून दिलेल्या आहेत .ज्या

प्रमाणे प्रशासन वसुली करणार आहे त्याचेही कौतूक करण्यात आलेले आहे.या बजेटवर चर्चा होतांना काही सूचना स.सदस्यांनी केलेल्या आहेत.यंत्रसामुग्री तसेच मटेरीयल घेण्याच्या दृष्टीकोनातून वेगवेगळया एजन्सीजला काम करण्यात विलंब होतो आणि विलंब झाल्यानंतर ते काम स्पिल ओवरमधे जते म्हणून सीआय पाईप आपण गत वर्षी पर्चेस हे कंपनीकडून केलेले होते.त्याच कंपनीचे उत्पादन असेल तर निश्चितपणे पर्चेस करावे यात महापालिकेचा फायदा होईल.होणाऱ्या बचतीमधे दुसरे कामे करण्यास मदत होईल.त्यासाठी संपूर्ण पाईप व इतर मटेरीयल खरेदी करीत असतांना जी जी कामे करणार आहोत त्यातील मटेरीयल कॉस्ट वेगळी करून निश्चीतपणे जी प्रोडक्शन कंपनी असेल त्यांना जहीर निविदा देवून टेडर आल्यानंतर कार्यवाही करावी जेणे करून महानगरपालिकेचा त्यात फायदा होईल.तसेच काही कामाचा उल्लेख या बजेटमधे करण्यात आलेला नाही त्यामूळे टोकन रक्कमा ठेवण्याची सूचना केलेली आहे.कदाचित प्रशासकीय अडचणी असतील गुंठेवारीच्या माध्यमातून महापालिकेस २० लक्ष रूपये मिळणार आहे असे मा.आयुक्तांनी आताच म्हटले.व खर्च होतील ते शासनाचे डायरेक्शन आल्यानंतर. आताच स.सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहे या शहराच्या हद्दीत जी जनता राहते आहे ती अधिकृत अनधिकृत असा भाग आपणांस म्हणता येणार नाही.शासनाने गुंठेवारी कायदा केला कोणत्या शहराची परीस्थिती समोर ठेवून केलेला आहे हे आजही आपल्या अकलेच्या बाहेर आहे.या शहराचा विचार करून हा कायदा केला असता तर काहीतरी दिलासा मिळाला असता यात शंका नाही.शासनाने सांगली ,सातांरा कोल्हापूर नागपूर येथील शहराची परीस्थिती समोर ठेवूनच फक्त हा कायदा लागू केलेला आहे असे वाटते.या शहराचा विचार केलेला नाही म्हणून गुंठेवारीच्या नावाखाली या शहरात विकास कामे होत नाही. आताच एक स.सदस्यांनी असे म्हटले की अनधिकृत कसे म्हणायचे जे की सदर वस्तीतील नागरीक या शहराचे मतदार असून मालमत्ता कर भरतात तसेच शहरात ज्या वसाहती येतात त्याभागातील जनता शहरात येणाऱ्या वस्तू खरेदी करतात .याचा अर्थ या महानगरपालिकेच्या उत्पन्नावर त्या नागरीकांचा अधिकार निश्चितपणे आहे.काही भागात आज चिखल झाला म्हणून पाणी देण्याचे बंद झालेले आहे टँकर जत नाही. परंतु नागरीकांना पाणी देवू नका असे कोणतेही शासन म्हणणार नाही. म्हणून जनतेला पाणी द्यायचे असेल व टँकरसाठी जण्यास रस्ता नसेल तर ती वस्ती अनधिकृत आहे की अधिकृत आहे याचा विचार न करता तो रस्ता झाला पाहिजेआणि अशा कामासाठी गुंठेवारी कायदा अडसर येईल असे वाटत नाही. अशा कामासाठी देखभाल दुरूस्ती व नवीन काम करण्याची गरज पडल्यास त्या कामासाठी दोन कोटीची तरतूद ठेवण्यात येत आहे.मा.मुख्यमंत्री यांचेही या महानगरपालिकेसाठी मोठे भरीव सहकार्य लाभेल असे वाटते. विकासाच्या कामामधे कोणतेही राजकारण करणार नाही असे आश्वासन या शहराचे मा.आमदार तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेचे आमदार या महानगरपालिकेस त्यांनी भेट दिली होती त्यावेळी म्हटले होते. विकास

कामासाठी मागणी करण्यास हरकत नाही. जे विधायक काम असेल ते या शहरासाठी निश्चिपणे करू या. मा.आमदार यांनी गुंठेवारीच्या संदर्भात मदत केली तर महापालिकेच्या वतीने त्यांचा सत्कारही केला जाईल. दुसरा मुद्दा असा की जे पाण्याच्या बाबतीत सर्व्हे करण्याच्या संदर्भात आहे. सध्या शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या दोन्ही पाईप लाईन द्वारे तीन ते चार वर्षात पाणी पूरवठा पूरेसा करू शकणार नाही म्हणून नवीन पाईप लाईन करण्याची गरज आहे त्यासाठीजे ३८ कोटीचे कर्ज उभारणी म्हणून दर्शविलेले आहे त्यानुसार या आर्थिक वर्षामधे ते काम कसे मार्गी लागेल यासाठी प्रयत्न करावेत त्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सिडको भागावर अन्याय नको म्हणून त्या शहराला जुळे शहर करावयाचे असेल तर त्या भागात नाट्यगृहासाठी शासनाने निवडणूकीच्या अगोदर सर्व रक्कम देणार आहोत असे कबूल केलेले होते त्या अनुदानासाठी आपण सर्व प्रयत्न करू १ कोटी रक्कम देवू शकतो असे मा.विभागीय आयुक्त यांनी म्हटले होते परंतु त्यासाठी ४.५० कोटीची आवशकता आहे एवढा पैसा महानगरपालिका खर्च करू शकत नाही त्यासाठी शासनाकडून अनुदानाची मागणी सर्वाच्या सहकार्याने करू. टोकन रक्कम म्हणून ५ लक्षची तरतूद करण्यात येत आहे.हर्सूल तलावातून ७ ते ८ एमएलडी पाणी या शहराला मिळते त्या पाण्यात खंड पडू नये व देखभाल दुरूस्तीसाठी जे काही खर्च लागेल त्यासाठी या बजेटमधे तरतूद केलेली आहे तसेच या शहरात ज्या महानगरपालिकेच्या वतीने वास्तू बांधण्यात आलेल्या आहेत त्या कार्यान्वित करून महानगरपालिकेने उत्पन्न कसे वाढविता येतील यासाठी प्रयत्न करावे तसेच जे संशोधन केद्र बांधण्यात आलेले आहे त्याकडे जनतेला व पर्यटकांना आकर्षित करण्यामधे कमी पडत आहे त्याकडे ही लक्ष देण्याची गरज आहे.आताच काही सदस्यांनी ५० कोटीची कामे या वर्षी करण्यातयावी असे म्हटले आहे यात १७ ते १८ कोटीची कामे ही स्पील ओवरची राहणार आहे परंतू पैसे खर्च करण्याची जबाबदारी आपली आहे परंतू जमा करण्याची जबाबदारी सूध्दा आपली आहे. यात मा.आयुक्त यांनी मालमत्ता कराचे ३५ कोटी रूपये वसूल करण्याचे प्रास्तावित केलेले आहे ही वसूली करतांना थकबाकी घेवू नका असे कोणीही सदस्य म्हणणार नाही आणि वसूली करण्यामधे सर्वच प्रशासनास मदत करतील यात शंका नाही. प्रशासनाच्या वतीने रूपये २२० कोटी ९८ लक्ष १० हजर चा सन २००५-०६ चा अर्थसंकल्प सभागृहासमोर आलेला होता.यामधे २.८० कोटी व ४५ हजर असे ओपनींग बॅलेंस दाखविलेले होते असे एकूण बजेट हे २२३ कोटी ७८ लक्ष ५५ हजराचे होते परंतु शहराच्या विकासाच्या दृष्टीने काही बाबी समावेश करण्यात आलेल्या आहेत.जकात संदर्भात बोलायचे झाल्यास १० उदयोजक येथे जस्त आले तर महानगरपालिकेच्या जकात वसूलीत वाढ होईल त्यासाठी एमआयडीसी भागात ज्या ज्या सुविधा दयाव्या लागणार आहे व विकास कामासाठी जी तरतूद ठेवलेली आहे त्यानुसार त्या भागात कामे करावी जेणे करून उदयोजकांना चालना मिळेल. जकात मधे ८० कोटीचे उद्दिष्ट दिलेले आहे त्यात १ कोटीची वाढ करण्यात येते.त्याचप्रमाणे पाणी पट्टी व

मालमत्ता कर यामधे ५ कोटीची वाढ करण्यात येते. नगररचना विकास शुल्क यामधे ६० लक्ष नमूद आहे त्यात ४० लक्षची वाढ करण्यात येते महापालिकेच्या मालमत्ता हया भाडेतत्त्वावर देण्याच्या दृष्टीने त्यात ३० लक्षची वाढ करण्यात येते भुसंपादनासाठी १५ कोटी ठेवले ते १० कोटी ठेवण्यात येते ५ कोटी कमी करण्यात येत आहे सर्वसाधारण सभेने कंपाउडींग फिस आकारण्या संदर्भात जे निर्णय घेतलेला आहे त्यामूळे वसूलीत भर पडणार आहे संपूर्ण असे ९.१० कोटीची वाढ करून व भुसंपादनाचे ५ कोटी कमी करून असा संपूर्ण अर्थसकल्प हा २३० कोटी ०८ लक्ष व २.८० लक्ष शिलकी अर्थसकल्प सन ०५-०६ ला मान्यता देत असतांना सर्वश्री आम्हाला आनंद होत आहे एकूण २३२.८८ कोटीचा अर्थसंकल्प तयार केलेला आहे या वर्षीचे निश्चित प्रकारे जे उद्दिष्ट ठरवून दिले आहे मोठी जबाबदारी सर्वानी उचललेली आहे यात मोठे श्रेय प्रशासनाचे निश्चित आहे हे सभागृहही प्रशासनास मदत करणार आहे. प्रशासनाने वसूली केल्यानंतर निश्चितपणे कौतुक करणार आहोतच सर्वानी चर्चेत सहभाग घेतला यामधे सर्व अधिकारी यांनीही सहभाग घेवून प्रशासनाच्या बाबी ज्याआहेत त्या सर्वाच्या निदर्शनास आणून दिल्या हा मंजूर अर्थसंकल्प मुख्यलेखाधिकारी यांनी मा.महापौर यांचेशी चर्चा करून तात्काळ कसा सादर करता येईल यासाठी प्रयत्न करावेत व या वर्षातील कामे तात्काळ कशी हाती घेता येतील याकडे प्रशासनाने लक्ष दयावे. या अर्थसंकल्पात जी जी कामे नमूद केलेली राहतील त्या सर्व कामाचे अंदाजपत्रक तयार करून दोन महिण्यात ही कार्यवाही करून ही कामे तात्काळ मार्गी कशी लागतील यासाठी प्रशासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे सर्व पत्रकार तसेच छायाचित्रकार यांचे सर्वाचे आभार मानून आजची सभा राष्ट्रगिताने संपविण्यात येत आहे.

**ठराव:**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रशासनाने मा.राज्य निवडणूक आयोग यांचे आदेश क्र.-रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.२४/का-५ दिनांक ०२-०२-२००५ व मा.प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्र.नमुंपा-२००४/१७०९/प्र.क्र.-१४/०५/नवि-२८ दिनांक ३१ जनेवारी २००५ च्या अनुषंगाने सन २००४-२००५ चे सुधारित अंदाजव सन २००५-२००६ या आर्थिक वर्षामधील ०१ एप्रिल २००५ ते ३१ जुलै २००५ या चार महिन्याच्या कालावधीतील लेखा अनुदानास मा.स्थायी समितीने ठराव क्रमांक २१४ दि.१७.०२.२००५ नुसार मान्यता प्रदान केलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ९५ अन्वये दि.६ जुलै २००५ रोजी स्थायी समिती सभागृहासमोर सादर करण्यात आलेले सन २००५-२००६ चे ३१ जुलै २००५ पर्यंतचे लेखानुदान व सन २००५-२००६ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार विनिमय होऊन सन २००५-२००६ चे मुळ अंदाजपत्रक रू.२३२ कोटी ८८ लाख ५५ हजर एकुण जमा व रू.२३२ कोटी ७५ लाख ४० हजर खर्चास व रू.१३.१५ लाखाच्या शिलकी अंदाजपत्रकास जमा व खर्च बाजुच्या प्रस्तावासह सर्वानुमते मान्यता देण्यात येऊन सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे प्रशासनातर्फे सन २००५-०६ वर्षाकरिता सभागृहासमोर सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात मा.सभापती, स्थायी समिती व स.सदस्यांच्या सल्ल्यानुसार फेरफार व दुरूस्ती करण्यात येऊन

प्रस्तावास फेरफार/दुरूस्तीसह मान्यता प्रदान करून त्यानुसार सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद